बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१३ गोंदिया | अंक ३२ | बुधवार, दि.१७ जुलै २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्रात भाजपमध्ये नव्या चेहऱ्याची मागणी?

## माजी आमदार व समाजकल्याण सभापतीच्या गावातच भाजप पिछाडीवर, लोकसभा निवडणुकीत देवरी तालुक्यातही भाजप पिछाडीवर

(खेमेंद्र कटरे)

**गोंदिया:-** गडचिरोली लोकसभा मतदारसंघात सलग दोनदा भारतीय जनता पक्षाचे अशोक नेते यांना जनतेने खासदारकीचा मान दिला. मात्र, २०२४च्या निवडणूकीत जनतेने त्यांना साफ नाकारले. त्यातही गोंदिया जिल्ह्यातील आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचा समावेश हा गडचिरोली लोकसभा मतदारसंघात होत असून देवरी तालुक्यात काँग्रेसने भाजपला चांगलीच पिछाडी दिली. परिणामी, येत्या विधानसभेच्या निवडणुकीत "जुना नको, तर नवा चेहरा हवा' असे सूर उमटू लागले आहेत.



लोकसभा निवडणुकीच्या निकालाने भाजपचे टेंशन मात्र चांगलेच वाढले दिसत आहे. २०१९ मध्ये संजय पुराम हे या मतदारसंघातून भाजपचे आमदार असताना भाजपचे उमेदवार अशोक नेते हे त्यावेळी विजयी झाले. त्यावेळी आमगाव मतदार संघातून नेते यांनी साडे अठरा हजार मतांची आघाडी होती. असे असताना सुद्धा त्यावेळी विधानसभेच्या निवडणुकीत पक्षावर दबाव आणून उमेदवारी खेचून आणण्यात श्री पुराम यांना यश आले होते. पक्षाने अधिकृत तिकीट दिले असताना जनतेने मात्र त्यांनी घरी बसवले होते. श्री पुराम यांच्या पराभवाला त्यावेळी अनेक कारणे महत्वाची ठरली होती. ते आमदार असताना त्यांच्या पत्नी या जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण सभापती होत्या, हे विशेष.

आता २०२४ च्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. अशात भाजपकडून पुन्हा उमेदवारी मिळावी, याकरिता पुराम दाम्पत्याने पुन्हा एकदा कंबर कसली आहे. राज्यात भाजपचे सरकार असल्याने थोडाफार निधी आणून विकास कामाकरीता निधी आणत असल्याचा भास जनतेमध्ये निर्माण करण्याचा श्री पुराम हे प्रयत्न करीत आहेत. मात्र, खुद्द पुराम यांच्याच देवरी तालुक्यात १७ हजार १५४ मताने भाजप मागे पडली.

उल्लेखनीय म्हणजे २०१९च्या निवडणुकीत अशोक नेते यांना देवरी तालुक्यात ६ हजार ९१ मतांची आघाडी होती. महत्वाचे म्हणजे माजी आमदार संजय पुराम व या क्षेत्राच्या सदस्या विद्यमान महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम ज्या पुराडा जिल्हा परिषद गटातील रहिवासी आहेत, त्या पुराडा जिल्हा परिषद गटामध्येच काँग्रेसने भाजपवर २ हजार २५० मतांची आघाडी घेतली आहे. त्यातही निवासस्थान असलेल्या पुराडा या गावातील तीनही बुथवर भाजप चांगलीच पिछाडीवर राहिली. स्वगावी पुराम दाम्पत्याला मतदानाची टक्केवारी वाढविण्यात कमालीचे अपयश आले. आपल्याच गावात पुराम दाम्पत्य भाजपला लोकसभेत आघाडी मिळवून देऊ शकलेले नाही. असे असतानाही श्री पुराम यांनी आमदारकीच्या उमेदवारीसाठी पुन्हा दावेदारी ठोकल्याने ङ्गआम्ही काय करायचे?फ असा विचार इच्छुक करु लागले आहेत. भरीसभर म्हणजे ज्या देवरी नगरपंचायतीवर पुराम यांचे विशेष प्रेम आहे आणि ज्या नगरपंचायतीवर भाजप-राष्ट्रवादीची सत्ता आहे, तिथे सुद्धा भाजपने सपाटून मार खाल्ला, हे विशेष.

आमगाव विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या क्षेत्राचे भाजपतील अनेक आमदार, खासदार व मंत्री यांनी प्रतिनिधीत्व केले आहे. त्यामुळे भाजप उमेदवार अशोक नेते यांना सर्वाधिक मताधिक्य मिळणे अपेक्षित होते. परंतु, असे न होता भाजप उमेदवार नेते यांना ८१ हजार ६९५ मते मिळाली, तर



काँग्रेस उमेदवार किरसान यांना ९२ हजार ५६४ मते मिळाली. काँग्रेसला १०,८६९ एवढ्या मतांचे मताधिक्य आमगाव विधानसभा मतदारसंघात मिळाले. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत या क्षेत्राने नेहमीच भाजपला साथ दिली. परंतु, या निवडणुकीत काँग्रेसची जादू चालली. त्यामुळे भाजपचा भ्रमनिराश झाला .त्याचे कारण मतदारांमध्ये आधीपासूनच दोन-वेळा खासदार असलेले उमेदवार पुन्हा देऊ नका, या मागणीकडे पक्षाच्या वरिष्ठांनी केलेले दुर्लक्ष हे आहे. पुन्हा विधानसभेतही त्याचीच पुनरावृत्ती होण्याची चिन्हे दिसत आहेत. या मतदारसंघाची धुरा ज्या माजी आमदारावंर देण्यात आली, तेच पूर्णतः अपयशी ठरल्याने आता या मतदारसंघात भाजपच्या मतदारांतच नाही तर कार्यकर्ते व अनेक पदाधिकारी ही दबक्या आवाजात नवा चेहरा पक्षाने देण्यावर विचार करावा, अशी कुजबूज सुरु झालेली आहे. या मतदारसंघातून उमेदवारी मिळविण्याच्या स्पर्धेत सध्या माजी आमदार संजय पुराम हे सर्वात आघाडीवर जरी असले तरी सामान्य जनतेमध्ये मात्र माजी समाजकल्याण सभापती देवराज वडगाये, डॉ.श्रीकांत राणा, शंकर मडावी यांच्यासह जिल्हा परिषदेच्या मागच्या पदाधिकारी निवडणुकीत समाजकल्याण सभापती पदाचे प्रबळ दावेदार असलेले हनवंत वट्टी यांच्यासह शिक्षकी पेशात असलेले पण समाजकारणात अग्रेसर असलेले चेतन उईके यांच्यापैकी कुणाच्या तरी नावाचा विचार करावा, असा सुर मतदारसंघात फेरफटका मारल्यावर दिसून येत आहे.

# अनेक मार्गावरील पूल जीर्णावस्थेत

**गोंदिया:** जिल्ह्यातील रस्त्यांवरील नद्या आणि कालव्यांवर बांधण्यात आलेल्या जीर्ण आणि अनियमित पुलांचा प्रश्न नवीन नाही. दरवर्षी पावसाळ्यात अनेक लोक पुराच्या पाण्यात बुडून मरतात आणि तेव्हाच ही समस्या समोर येते. मात्र पावसाळा संपताच शासनासह प्रशासन फाईल बंद करते. रेलिंग नसलेल्या पुलाचा प्रश्न अजूनही कायम आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही जोरदार पाऊस झाल्यास हे जीर्ण पुल जीवघेणे ठरतील. मात्र पुलांच्या दुरुस्तीसाठी कोणताच पुढाकार होताना दिसत नाही.

### राष्ट्रीय महामार्गाची स्थिती

**गोंदिया-कोहमारा राज्य रस्त्याला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यात आला. त्याअंतर्गत गोंदिया ते घोटी हा सिंमेट रस्ता तयार करण्यात आला. यानंतर जुन्या रस्त्याचे डांबरीकरण करुन नवीन रस्ता तयार करण्यात आला. या माार्गावर अनेक अपघात प्रवण ठिकाणे आहेत. यापैकी जनाटोला ते भडंगा गावांमधील चेपता पूल गेलया अनेक वर्षापासून दुर्लक्षीत आहे. दव्वा ते खजरी दरम्यानच्या पुलाच्या अरुंदपणामुळे या पुलावर नेहमीच अपघात होत असतात.**

### तो रस्ताही धोक्यापासून मुक्त नाही

**गोरेगाव ते डाकराम सुकडी हा महत्वाचा मानला जाणारा आणि गोरेगाव-तिरोडा तहसीलला जोडणारा रस्ता धोकादायक आहे. कारण हा मार्ग नागझिरा अभयारण्यातून जातो. या मार्गावर अनेक छोटे पूल आहेत. अर्ध्याहून अधिक पुलांवर रेलिंग बसवण्यात आलेले नाही. या मार्गावर दररोज एसटी बस, ऑटोरिक्षा, काली-पिली आदी वाहनांची वर्दळ असते.**



जिल्ह्यातील अनेक मार्गावर विकासकामे सुरु आहेत. मात्र प्रत्यक्षात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते आणि त्यावर रेलिंग नसलेले बांधलेले पूल नागरिकांचा जीव घेत आहेत. तिरोडा, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी आदी सर्वच तालुक्यातील जिल्हा मुख्यालयाला जोडणारे रस्ते मृत्यूला आमंत्रण देत आहेत. त्यापैकी गोरेगाव-म्हसगव जिल्हा मार्गावरील पांगोली नदीवर बांधलेला जीर्ण पूल आहे. गोरेगाव तहसील मुख्यालयापासून दीड कि.मी. दूर घोटी, म्हसगाव, कालीमाटी रस्त्यावर पांगोली नदीवर चाळीस वर्षापुर्वी छोटा पूल बांधण्यात आला. हा पूल पूर्णपणे जीर्ण झाला आहे. तर जुन्या बांधकामानुसार या पुलाची उंची कमी आहे. पुलावरील रेलिंग गायब झाले आहे. मात्र या पुलावर संबंधित विभागाकडून दिशादर्शक फलक लावण्यात आलेला नाही. तसेच आदिवासी व नक्षलवादी बहुल सालेकसा तालुक्यातील घोन्सी-नानवा रस्त्यावर कुवध नाल्यावर बांधलेल्या पुलाला ३० ते ३५ वर्षे पूर्ण झाली असून, हा पूलही शेवटच्या टप्प्यात आहे. त्याचबरोबर अर्जुनी तालुक्यातील राका ते सौंदड रस्त्यावरील पुलावर अनेक वर्षापासून रेलिंग बसविण्यात आलेले नाही. दरम्यान, राका-पलसगाव येथील चुलबंद नदीवर धरण बांधून २३ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पुलावर बसवलेले सेफ्टी रेलिंग चार वर्षापुर्वी पुराच्या पाण्यात वाहून गेले होते. त्यानंतर ते पुन्हा बसवण्यात आले नाही. अशा स्थितीत वाहनचालकांसह पादचाऱ्यांनाही जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. विशेषत: जिल्ह्यात शेकडो जीर्ण पुल असून, संबंधित विभागाचे दुर्लक्ष आणि लोकप्रतिनिधींच्या उदासिनतेमुळे हे पुल आता अपघाताची वाट पाहत आहेत.

# सहा.बीडीओ पदी पदोन्नती मिळूनही मडामेंचा मात्र कृषी विभागातच ठाण

**गोंदियाः** गेल्या ११-१२ वर्षापासून जिल्हा परिषदेच्या कृषी विभागात ठाण मांडून बसलेले कृषी विभागातील प्रभारी कृषी विकास अधिकारी महेंद्र मडामे यांच्यामुळे जिल्ह्यातील अनेक कृषी केंद्रचालक कंटाळल्याचे वृत्त समोर येऊ लागले आहे.विशेष म्हणजे सालेकसा सारख्या आदिवासी व नक्षलग्रस्त असलेल्या पंचायत समितीमध्ये त्यांची गेल्या ३ महिन्यापुर्वी सहाय्यक गटविकास अधिकारी या पदावर पदोन्नती झालेली आहे.मात्र मडामे यांनी फक्त मनाने नव्हे तर कागदोपत्री रुजू होण्याचे सोपस्कर पार पाडून आपला जुना प्रभार मात्र अद्यापही का सोडलेला नाही हा प्रश्न उपस्थित झालेला आहे.



तर जिल्ह्यातील अनेक कृषी दुकानदारांनी साहेब शनिवार रविवारला तपासणीच्या नावावर येतात असे सांगत आम्ही मात्र अधिक काही माहिती देऊ शकत नाही, आम्हाला व्यवसाय करायचा आहे.अधिकारी वर्गासोबत कशाला भांडण वाद करायचे असे दबक्या आवाजात बोलत आहेत.

एकीकडे जिल्हा परिषदेत पारदर्शक प्रशासनाचे धडे अधिकारी कर्मचारी यांना दिले जात असतांना सालेकसा सारख्या दुर्गम, आदिवासी नक्षलग्रस्त भागातील सहाय्यक गटविकास अधिकारी सारख्या पदावरील व्यक्तीला जिल्हा परिषदेत ठेवणे म्हणजेच त्या तालुक्यातील जनतेचेच नव्हे तर तेथील लोकप्रतिनिधींचा अवमान असल्याचे बोलले जात आहे.मडामे हे गोंदिया पंचायत समितीतून जिल्हा परिषदेत मोहीम अधिकारी म्हणून अंदाजे ११ वर्ष कार्यरत राहिले.त्यानतंर जवळपास ४ वर्षापासून त्यांच्याकडे कृषी विकास अधिकारीचे प्रभार सुध्दा आहे.कृषी विकास अधिकारी पदामुळे काही हितसंबध तर जुडले नसावेत ना ज्यामुळेच त्यांना या पदाला सोडून पदोन्नती मिळालेल्या सालेकसा येथे जाण्यास स्वारस्य दिसून येत नाही, असे अनेक प्रश्न आत्ता निर्माण होऊ लागले आहेत. त्यातच आता त्यांना मिळालेली पदोन्नती नाकारायला काय हरकत अशी चर्चाही सुरु झाली आहे.

# साहेब, त्या पुलावरुन जड वाहतूक त्वरित बंद करा

**सालेकसा:** आमगाव-सालेकसा राज्य महामार्ग क्रमांक ३३५ वर वाघ नदीवरील पूल जीर्ण झाला असून, जड वाहन जाताना पुलाचा काही भाग हलतो. अशात जड वाहतूक सतत सुरु राहिल्यास पुल कोसळण्याची शक्यता बळावली आहे. ही बाब लक्षात घेत या पुलावरुन जड वाहतूक त्वरित बंद करावी, यासाठी तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात धाव घेतली आहे.

हा मार्गा सालेकसा-आमगाव या दोन तालुक्यांना जोडत असतानाच महाराष्ट्र राज्याला मध्यप्रदेश व छत्तीसगड या दोन राज्यांशी जोडणारा आहे. अत्यंत वर्दळीच्या या महामार्गावर दररोज शेकडो वाहनांची ये-जा असते. मागील वर्षी नागपूर येथील अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना हा पूल जीर्ण अवस्थेत असल्याचा अहवाल सादर करुन या मार्गावरील अवजड वाहनांची वाहतूक तत्काळ थांबविण्यास सांगितले होते. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचे विशेष अधिकार वापरुन पुलावरील अवजड वाहनांची वाहतूक तत्काळ थांबविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पुलाच्या दोन्ही बाजूंची अवजड वाहनांना येण्यास मनाई करणारे फलकही विभागाने लावले आहेत. त्यानंतरही पुलाच्या दोन्ही बाजूंची जड वाहनांची ये-जा सुरु असून या पुलाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.

या पुलावर जड वाहनांची ये-जा थांबवावी आणि आमगाव-सालेकसा रस्त्यावरील खड्डे तातडीने



### धोका झाल्यास जबाबदार कोण?

**जड वाहनांमुळे पुल हलत असून अशात एखादी अप्रिय घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुल जड वाहतुकीसाठी योग्य नसल्याने त्यावरुन जड वाहतूक बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, त्यानंतरही जड वाहतूक सुरुच असल्याने एखादा धोका झाल्यास त्याला जवाबदार कोण, असा सवालही जि.प.सदस्यांसह तालुकावासीयांनी केला आहे.**

बुजवावेत, तसेच रस्त्याच्या पुनबांधणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठावावा, अशी मागणी जि.प.सदस्य वंदना काळे, छाया नागपुरे, विमल कटरे यांनी केली आहे. याावेळी सामाजिक कार्यकर्ते राजू काळे, शंकर नागपुरे यांनीसुद्धा निवेदन सादर करुन अवजड वाहनांची वाहतूक तातडीने बंद करण्याचा आग्रह केला.

# बांधकाम विभागाच्या पदोन्नतीत गौडबंगाल

## सीईओंनी दिले चौकशीचे आदेश: सूचनांकडे दुर्लक्ष करणे येणार अंगलट



**गोंदिया:** येथील जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग सातत्याने विविध विषयाला घेऊन चर्चेत राहत असून कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांच्या झालेल्या पदोन्नती प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी चौकशीचे आदेश दिल्याने खळबळ माजली आहे. विशेष म्हणजे एप्रिल महिन्यातच जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नतीत मिळालेल्या कनिष्ठ अभियंता व स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना आपली मूळ कागदपत्र व संबंधित शासन निर्णय ३१ मे पर्यंत देण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे वृत्त समोर आले आहे.चर्चेनुसार ८ कनिष्ठ अभियंत्यांना कागदपत्र सादर करण्याची मुदत देण्यात आली होती,ती मुदत संपली असली तरी सुमारे ४० लाखाची रसद देण्यात आल्याची चर्चा आहे.

जिल्हा परिषदेत शासन निर्णयांना तिलांजली देत २-३ वर्षापासून पदोन्नत्या देण्याचा सपाटा सुरु झालेला आहे. त्यामध्येच बांधकाम विभागाने गेल्या वर्षभरापासून नियमबाह्यरित्या स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती दिल्याचे प्रकरण समोर आले आहे. शासन ५० वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक ग्राह्य धरा असे म्हणत असताना बांधकाम विभागाने ४५ वर्षे पूर्ण होण्याचा दिनांक ग्राह्य धरण्याचे कारण काय असे अनेक प्रश्न यामाध्यमातून उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे बदलीच्या दिवशी तत्कालीन अति.मुकाअ यांनी प्रभार सोपविण्यासह काही निर्णय घेतले होते. त्या सर्व प्रकरणाची आता विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी तपासणी करत असून कनिष्ठ अभियंता पदाकरिता सादर करण्यात आलेले सर्व मूळ कागदपत्राच्या सांक्षाकित प्रतिसह शासन निर्णय, शैक्षणिक (तांत्रिक व अतांत्रिक) अर्हतेचे कागदपत्र, नियम व परिपत्रकाची मागणी करण्याचे निर्देश दिले होते.

त्या निर्देशावर सामान्य प्रशासन विभागाने काय कारवाई केली हे अद्यापही गुलदस्त्यात असल्याचे बोलले जात आहे. या पदोन्नत्या देताना कार्यकारी अभियंता व सामान्य प्रशासन विभागाने नियमांची पायमल्ली करुन काही स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना कनिष्ठ अभियंता या पदावर शासनाच्या ११ ऑगस्ट २०२२ च्या परिपत्रकाला वाटण्याच्या अक्षता दाखविल्या आहेत. या शाासन निर्णयात स्पष्टपणे पदोन्नतीकरिता विभागीय व व्यवसायीक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट हवी असल्यास शासन सेवेत वयाचे १५ वर्ष सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्ष पूर्ण होण्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा कर्मचाऱ्यास पदोन्नतीकरिता विभागीय व व्यावसायीक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचा दिनांक समजण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख आहे. असे असतानाही जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने या गेल्या काही आर्थिक वर्षात केलेल्या सर्व कनिष्ठ अभियंत्याच्या पदोन्नत्या या नियमबाह्य पद्धतीने झालेल्या आहेत.

या सर्व नियमबाह्य पदोन्नती प्रकरणाची तपासणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही न करता त्या पदोन्नती फाईलवर स्वाक्षरी करुन बांधकाम विभागाच्या गैरव्यवहाराला हातभार लावल्यासारखेच होत आहे. गेल्या २-३ वर्षातील प्रकरणाची चौकशी केल्यास पदोन्नत्या या नियमबाह्य झाल्या असून त्या स्थापत्य अभियांत्रिकीच्या पदव्या या खरंच मान्य आहेत की नाही याचीही साधी चौकशी विभागाने संबंधित विभागाकडून केले नसल्याचे चर्चा आहे.

### शासन आदेशाला केराची टोपली

**स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावरुन कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती देताना शासन निर्णयानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहायक पदावर कर्मचारी स्थायी असावा. अहर्ता परीक्षा उत्तीर्ण असावा. व्यावसायीक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक (पदवी/पदविका धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बंधनकारक नाही) त्यातच विभागस्तर व व्यवसायीक परीक्षा उत्तीर्णपासून सूट हवी असल्यास ५० वर्ष पूर्ण किंवा सेवेची १५ वर्ष होण्याची जी तारीख नंतरची असेल ती पकडण्यात यावे, असे म्हटलेले असतानाही या नियमातही फाटा देण्यात आलेला आहे. जिल्हा पषिदेच्या बांधकाम विभागाच्या कार्यप्रणालीकडे बघितल्यास शासनाने ठरविलेल्या निकषांची अवहेलना करुन अर्थपूर्ण व्यवहारातून पदोन्नती प्रकरणे हाताळले जात असल्याची म्हणण्याची वेळ आली आहे.**

### अटी शर्तीनाही दाखविला ठेंगा

**मागील २-३ वर्षापुर्वी झालेल्या पदोन्नतीमध्ये पदोन्नत कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी पूर्णपणे बेकायदेशीर पदोन्नत झाले आहेत. हे उघड असूनही कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नाही. बेकायदेशीर पदोन्नत कर्मचाऱ्यावर कुठलीही कार्यवाही न झाल्याने उर्वरित स्थापत्य अभियांत्रिकी सहायक(गट) जे दूरशिक्षण पदविकेचे प्रमाणपत्र घेऊन बसले त्यांनी आम्हाला पण याच आधारावर पदोन्नती द्या किंवा पदोन्नत कर्मचाऱ्यावर कारवाई करा, अशी मागणी सातत्याने करत आले आहेत. व्यवसायीक परीक्षा अनुत्तीर्ण असून शासकीय सेवेतील १५ वर्षाची अट पूर्ण नाही. अशा नियमबाह्य झालेल्या पदोन्नती प्रकरणाची खरंच विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी निष्पक्ष चौकशी करतील काय याकडे लक्ष लागले आहे.**

# पालकमंत्री बेपत्ता! थेट पोलीस ठाण्यात तक्रार

**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील विकासाचा प्रश्न, रस्ते, पाणी आणि आरोग्यविषयक प्रश्न कायम असताना जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्ह्याकडे फिरकुनही पाहिले नाही. त्यामुळे जिल्ह्याला वाऱ्यावर सोडून थाऱ्यावर नसलेले पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित बेपत्ता झाल्याची तक्रार राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अजय मेश्राम यांनी थेट पोलीस ठाण्यात केली. सध्या जिल्ह्यात हा चर्चेचा विषय ठरत आहे.



नऊ महिन्यांपूर्वी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून नंदुरबारचे आमदार आणि राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांची वर्णी लागली. त्याआधी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालकमंत्री होते. मात्र पालकमंत्री झाल्यानंतर डॉ. गावित यांनी भंडारा जिल्ह्याला वाऱ्यावर सोडल्याचा आरोप अजय मेश्राम यांनी केला आहे. निवडणुकीत मोठ्या नेत्यांसोबत कधीतरी हजेरी लावणारे गावित निवडणुकीनंतर पूर्णतः गायब झाले. त्यामुळे अनेक दिवसापासुन प्रशासकीय कामावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण नसुन शहरात प्रशासकीय कामे ङ्गराम भरोसे सुरु आहेत. अनेक ठिकाणी शासकीय यंत्रणेमध्ये अधिकारी मनमर्जी प्रमाणे वागत असल्याने जिल्ह्याच्या विकास कामांना मोठा फटका बसत असल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.

जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, वैनगंगा नदी पात्रात वाढत चाललेल्या वनस्पतीमुळे नदीतील माशांना ऑक्सिजनचा पुरवठा होत नसल्याने त्यांचा मृत्यू आहे, पीक विम्याचा लाभ अनेकांना अद्याप मिळालेला नाही, शेतकऱ्यांचे प्रश्न असे अनेक प्रश्न असताना जिल्ह्याचे पालकत्व स्विकारलेले विजयकुमार गावीत यांना कोणतेही सोयरसुतक नसल्याचा आरोप मेश्राम यांनी केला आहे.

गावितांवर भंडाऱ्याचे पालकत्व लादले गेले आहे. त्यामुळे त्यांनी अद्याप इकडचा रस्ता धरला नाही, असे नागरिक बोलू लागले आहेत. सत्तापक्षाने आजवर भंडारा जिल्ह्यावर सातत्याने अन्याय केला आहे. आजवर जिल्ह्याला नेहमी बाहेरचा पालकमंत्री थोपवला गेला आहे. शिंदे-फडणवीस-पवार सरकारमध्ये गावितांचा रूपाने ही परंपरा कायम राहिली आहे. माजी मंत्री बंडू सावरबांधे यांच्याव्यतिरिक्त आजवर भंडारा जिल्ह्याला स्थानिक पालकमंत्री मिळालेला नाही. पालकमंत्र्यांच्या बाबतीत भंडाराकरांचे नशीबच खराब आहे. पालकमंत्री गावित जिल्ह्याला वेळ देतील, त्यांच्याकडून विशेष लक्ष दिले जाईल, असा विश्वास लोकांचा विश्वास होता मात्र या विश्वासावर विजय गावित खरे उतरले नाहीत.

पालकमंत्र्यांकडून जिल्हा प्रशासनाला बऱ्याच दिवसांत कोणतेही निर्देश नसल्याने बरीचशी कामे प्रलंबित आहेत. पालकमंत्र्यांना आढावा घेतल्याशिवाय जिल्ह्यातील कामे मार्गी लागणार नाहीत. भंडारा जिल्ह्यातील नागरिक पालकमंत्री नाहीत म्हणून ओरड करत आहेत. बाहेरचा पालकमंत्री आम्हाला नको, अशी मागणी भंडाराकरांनी खूप आधीपासून केलेली आहे, गावितांसाठी भंडारा जिल्हा जर ङ्गजबरदस्तीचा राम रामफ असेल तर आताही मुख्यमंत्र्यांनी त्यांना बदलवून दुसरा पालकमंत्री द्यावा, अशी मागणी मेश्राम यांनी केली आहे.मी २६ जानेवारीला पालकमंत्री गावित यांची भेट घेतली, तेव्हापासून ते जिल्ह्यातून बेपत्ता झाले.

पालकमंत्री साहेबांना शोधून कुणीतरी माझा संवाद त्यांच्याशी घालून देण्याची मागणी अजय मेश्राम यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अजय मेश्राम यांनी भंडारा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली तक्रार करते वेळी निलिमा रामटेके, अथर्व गोंडाणे, ईश्वर कळंबे, बबन बुद्धे, राजा खान, प्रमोद चौहान शरीफ खान व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय

# मोगलाई मराठ्यांची राजकीय दादागिरी...!!

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपासून अर्थात १९६० पासून महाराष्ट्र राज्याच्या सत्तेवर ऐनकेन प्रकारे मराठ्यांचीच पकड असली पाहिजे. या दुष्ट हेतूने मोगलाई मराठे वागल्याचे अनेक पुरावे महाराष्ट्राच्या राजकारणात सापडतात. एकप्रकारे हा जातियवादच आहे. आणि तो जातियवाद मोगलाई मराठे यांनी जाणिवपूर्वक पाळला आहे हे घडलेल्या घटनांवरून स्पष्टपणे सिद्ध होते...!!

१९६० पासून २०२४ पर्यंत महाराष्ट्र राज्याचे बहुतेक मुख्यमंत्री हे मराठा समाजाचेच झाले आहेत. परंतु मराठा समाजाच्या व्यतिरिक्त झालेल्या मुस्लिम, दलित, ब्राह्मण, ओबीसी मुख्यमंत्री यांना हटविण्यासाठी,आणि आंबेडकरवादी मुख्यमंत्री होवू नये म्हणून मोगलाई मराठ्यांनी कसे षडयंत्र रचले आणि त्यांची कारकीर्द कशी संपुष्टात आणली हाही इतिहास मोठा रंजक आहे...!!

१९७८ साली इंदिरा गांधी यांनी दिल्लीतुन महाराष्ट्रात प्रभारी पाठविला आणि महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदी नाशिकराव तिरपुडे यांची निवड करावी असा आदेश होता. इंदिरा काँग्रेस च्या प्रभारी यांनी जेव्हा दिल्लीचा आदेश वाचून दाखविला तेव्हा महाराष्ट्रातील १४० मराठा आमदारांनी बंडखोरी करण्याचा पवित्रा घेतला. प्रभारी यांना न जुमानता मराठा आमदार दिल्लीला गेले आणि इंदिरा गांधी यांना ठणकावून सांगितले आम्हाला बौद्ध मुख्यमंत्री मुळीच चालतं नाही. मराठा आमदारांचा पवित्रा बघून इंदिरा गांधी यांनी नाशिकराव तिरपुडे यांची समजूत काढली, नाशिकराव तिरपुडे यांना उपमुख्यमंत्री बनविले, आणि मराठा समाजाचे वसंत दादा पाटील मुख्यमंत्री झाले...!!

तेव्हा पासून आतापर्यंत एकही आंबेडकरवादी महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री झाला नाही, हा जातियवाद नाही का.??

१९८० साली महाराष्ट्र राज्याचे बॅरिस्टर ए. आर. अंतुले हे पहिले मुस्लिम मुख्यमंत्री झाले....!!

बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांना पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करु दिला नाही. त्यांच्या पाठिमागे सिमेंट घोटाळ्याचे शुक्लकाष्ठ लावण्यात आले. खरं म्हणजे सिमेंट घोटाळा झालेलाच नव्हता परंतु अंतुले यांना बदनाम करुन त्यांचा राजीनामा घेण्यात आला पाहिजे त्यासाठी सिमेंट घोटाळा हा बनाव तयार करण्यात आला होता. तो बनावट घोटाळा शरद पवार साहेब यांनी समाजवादी नेत्यांना हाताशी धरून रंगविला (संदर्भ दगाबाज शरद पवार पुस्तक.लेखक एम.बी.पाटील.) आणि मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांना दोन वर्षांत घरी पाठविले. आम्हाला मुस्लिम मुख्यमंत्री चालतं नाही असाच हा प्रकार आहे म्हणून हा जातियवाद नाही का.??

१९९१ साली ओबीसी समुहातील सुधाकरराव नाईक हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनाही पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करु दिला नाही.१९९२ साली मुंबई दंगल पेटविण्यात आली. त्या दंगली साठी नेमलेल्या श्रीकृष्ण आयोगाने हे संशोधन करुन सांगितले आहे की,दंगल पेटविण्यात आली या दंगलीत राजकीय नेतृत्वाचा मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप होता. आणि त्या दंगलीचा ठपका सुधाकरराव नाईक यांच्या वर ठेऊन १९९३ साली दोन वर्षांत सुधाकरराव नाईक यांना मुख्यमंत्री पदाची खुर्ची खाली करावी लागली...!!

आम्हाला ओबीसी मुख्यमंत्री चालतं नाही म्हणून षढयंत्रकारी पद्धतीने त्याला घरी पाठविणे हा जातियवाद नाही का.??

१९९५ मध्ये महाराष्ट्रात पहिल्यांदा शिवसेना, भाजप युतीचे सरकार आले. त्यावेळी शिवसेनेचे ओबीसी समुहातील छगन भुजबळ हे मुख्यमंत्री पदाचे प्रबळ दावेदार होते. त्यांना मुख्यमंत्री बनविल्या गेले नाही म्हणून त्यांनी शिवसेना सोडली. मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले ते मराठा समाजाच्या बाहेरचे आहेत म्हणून मराठा समाजाच्या आमदारांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या वर दबाव वाढविला मनोहर जोशी यांचा राजीनामा घेतला त्यांना पाच वर्षाची कारकीर्द पुर्ण करता आली नाही. १९९९ मध्ये एक वर्षासाठी नारायण राणे या मराठा समाजाच्या नेत्याला मुख्यमंत्री केले तेव्हा मराठा आमदार शांत झाले...!!

आम्हाला मराठा समुहाच्या बाहेरचा मुख्यमंत्री चालतं नाही हा जातियवाद नाही का.??

२००३ साली पहिल्यांदा दलित समुहातील सुशीलकुमार शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले परंतु त्यांना केवळ एक वर्ष मुख्यमंत्री म्हणून कारकीर्द मिळाली. त्यांच्या नेतृत्वाखाली २००४ ची विधानसभा निवडणुक पार पडली काँग्रेस पक्षाला दलितांनी भरभरून मते दिली आणि सुशीलकुमार शिंदे यांच्या ऐवजी विलासराव देशमुख यांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री बनविले गेले...!!

मराठा सोडून मुख्यमंत्री चालतं नाही हे पुन्हा सिद्ध झाले हा जातियवाद नाही का.??

महाराष्ट्राच्या राजकीय सारीपाटावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना या चारही राजकीय पक्षात प्रस्थापित मराठ्यांनी मजबूत पकड बसविली आहे...!!

शिवसेनेमध्ये ओबीसी नेते छगन भुजबळ यांना १९९५ मध्ये संधी येऊनही मुख्यमंत्री बनविले नाही. संपूर्ण आयुष्य शिवसेने साठी वाहिलेल्या शिवसैनिकाचा हा अंत पाहण्याचा प्रकार आहे. काँग्रेस मध्ये १९७८ साली नाशिकराव तिरपुडे यांच्या संदर्भात जे घडले तेच शिवसेने मध्ये छगन भुजबळ यांच्या संदर्भात घडले फरक कुठं आहे.? आणि म्हणून हा नवा जातियवाद आहे...!!

भाजपमध्ये ओबीसी नेते गोपीनाथ मुंडे यांनाही २०१४ साली संधी येऊनही भाजपने मुख्यमंत्री बनविले नाही. काँग्रेस मधील नाशिकराव तिरपुडे, शिवसेने मधील छगन भुजबळ आणि भाजपमधील गोपीनाथजी मुंडे हे जातियवादाचे बळी ठरले म्हणून मुख्यमंत्री होऊ शकले नाही हेच महाराष्ट्रातील राजकीय वास्तव आहे....!!

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ३० खासदार सर्वच राजकीय पक्षातील मराठा समुहाचे निवडून येतात आणि ओबीसी, टिपून,टिपून पाडले जातात हे जातियवादाचे लक्षण नाही का.?

बौद्ध, दलित, मुस्लिम, ओबीसी मुख्यमंत्री आम्हाला चालतं नाही अशा मग्रुरी च्या अविर्भावात वागणा-या सरंजामी समुहाला वठणीवर आणायचे असेल आणि पुरोगामी महाराष्ट्रातील राजकीय जातियवाद संपवायचा असेल तर बौद्ध, दलित मुस्लिम आणि ओबीसी बांधवांनी एकत्र येऊन आपले राजकीय हक्क आणि अधिकार मिळविले पाहिजे ही काळाची गरज आहे...!!

आपल्याच समुहातील गरीब मराठा बांधवांना सत्तेत शिरकाव करु न देणारे मोगलाई मराठे सरंजामी वृत्ती सोडणार नाहीत आणि सत्तेत ओबीसी, बौद्ध,दलित, मुस्लिम यांना त्यांचा वाटा देणार नाहीत हे लक्षात घेऊन सर्वांनी एकत्र येऊन सरंजामी वृत्ती संपवली पाहिजे ही काळाची मागणी आहे...!!

जयभीम.

**भास्कर भोजने.**

## मांग-मातंग समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ

**गोंदिया:** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालय गोंदिया अंतर्गत शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जातीतील मांग/मातंग व समाजातील बारा पोट जातीतील विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्याचे ठरविले आहे. जे विद्यार्थी/विद्यार्थीनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदविका परीक्षेमध्ये कमीत कमी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झाले असतील अशा विद्यार्थ्यांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, पतंगा मैदान, गोंदिया येथे शैक्षणिक कागदपत्रे जसे- जातीचा दाखला, गुणपत्रिका, शाळेचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, राशन कार्ड, दोन फोटो यासह २५ जुलै २०२४ पर्यंत संपर्क साधून अर्ज सादर करावे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# जातीय धृवीकरणातून दहशतः फडणवीसांचे मणीपूरी षडयंत्र

क्रांती करायची असो की प्रतिक्रांती! समाजात धृवीकरण अनिवार्य असते. वर्गीय समाजात वर्गीय धृवीकरण व जातीय समाजात जातीय धृवीकरण! वर्गीय समाजात भांडवलदार हा शोषित गरीब वर्गाचा हितकर्ता वा मसिहा म्हणून पुढे येतो. जमीनदारांच्या सरंजामशाहीत कूळ-शेतकरी-शेतमजूर म्हणून त्याचे जे क्रूरपणे शोषण होते व अनन्वीत अत्याचार होतात, त्यातून त्यांची सुटका करण्याचे काम भांडवलदार-कारखानदार वर्ग करीत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना आवाहन केले की, "खेडी सोडा, शहराकडे चला!" गावाकडच्या शेतातील पशुतुल्य व असह्य सरंजामी गुलामगिरी-पेक्षा शहरातल्या कारखान्यातील लोकशाहीवादी भांडवली गुलामगिरी सुसह्य वाटणे स्वाभाविक असते.

भांडवलशाहीच्या या प्राथमिक टप्प्यात भांडवलदार-कारखानदार पुरोगामी, लोकशाहीवादी व मानवतावादी रूपात असतो. परंतू जसजसा भांडवलशाहीचा विकास होत जातो, तसतशी भांडवलशाहीतील जीवघेणी स्पर्धा, नफेखोरी वाढत जाते व कामगारांचे असह्य असे तीव्र शोषण वाढत जाते. मित्र वाटणारा कारखानदार शत्रू वाटायला लागतो. कामगारविरोधी भांडवलदार हे धृवीकरण जन्माला येते. या वर्गीय संघर्षातून पुढे साम्यवादी-मार्क्सवादी क्रांती होते व समाज आणखी एका पुढच्या विकासाच्या टप्प्यावर पोहचतो.

ओबीसी विरूद्ध मराठा या जातीय संघर्षात मराठा सुरुवातीला पुरोगामी, सत्यशोधक-फुलेवादी मुखवटा घालूनच पुढे आला. १९३० साली मराठ्यांनी हा पुरोगामी मुखवटा का परिधान केला, याची सविस्तर चर्चा मी माझ्या अनेक लेखांमध्ये व पुस्कांमध्ये केलेली आहे. ज्या वाचकांना अधिक जाणून घ्यायचे असेल त्यांनी माझी किमान दोन पुस्तके वाचली पाहिजेत. (पहिले पुस्तक- "मराठा समाजाचे ओबीसीकरण व जातीअंताचे धोरण" व दुसरे पुस्तक- ओबीसी-मराठा-बहुजनः मोर्चे प्रतिमोर्चे व पुरोगामी महाराष्ट्राची फरफट)

१९२५ ते १९३० च्या तत्कालीन राजकीय लढाईत ब्राह्मणांच्या विरोधात मराठे जिंकू शकत नव्हते. कारण टिळकांच्या नेतृत्वाखाली बऱ्याच ब्राह्मणांनी स्वातंत्र्य चळवळीत घुसखोरी केली होती, त्यामुळे टिळक हे देशाचे ताकदवान नेते बनलेले होते. देशाचे नेते बनलेल्या टिळकांसमोर राज्यातील एकजातीय क्षुल्लक मराठा नेत्यांची दाळ कशी शिजणार? "असेंब्लीमध्ये येऊन कुणबटांना काय नांगर हाकायचा आहे काय" असा प्रश्न विचारत बाळ टिळकांनी डरकाळी फोडली आणी मराठ्यांची घाबरगुंडी उडाली. आपल्या स्वतःच्या मराठा जातीचे राजकीय अस्तित्व निर्माण करण्यासाठी त्यांना कुणबी, माळी, तेली या जातींची साथ हवी होती. तत्कालीन ओबीसी हा सत्यशोधक चळवळीच्या प्रभावाखाली असल्याने तो सहजासहजी मराठ्यांशी दोस्ती करणारा नव्हता. म्हणून तत्कालीन मराठा नेते तात्यासाहेब महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीत घुसले व पुरागामी मुखवटा घेऊन ओबीसी जातींशी दोस्ती करू लागलेत.

मराठ्यांच्या पुरोगामी मुखवट्याला १९३० साली ओबीसी भुलले व १९९३ साली दलित फसलेत. अशा मुखवट्यांच्या बाजारात पुरोगामी जातीय धृवीकरण केवळ अशक्यप्राय बनते. कारण पुरोगामी मुखवटे घालून शत्रूच आपल्या छावणीत घुसतो. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतलेला आंतरजातीय विवाह जातीअंतासाठी होता. मात्र याच आंतरजातीय विवाहाचा पुरोगामी मुखवटा घालून अनेक उच्चजातीय स्त्रीया मोक्याच्या जागांवर बसलेल्या दलित अधीकारी व दलित नेत्यांच्या घरात घुसल्या आहेत, आणी त्या दलित चळवळीचा सत्यानाश करीत आहेत. असाच सत्यानाश मराठ्यांनी १९३० साली सत्यशोधक चळवळीचा केला.

सत्यशोधक मुखवटा घालून तात्यासाहेब महात्मा फुलेंची चळवळ मराठ्यांनी संपवली व त्याबदल्यात दलालीचा मेहनताना म्हणून महाराष्ट्राची राजकीय सत्ता मिळवली.

घुसखोरी करून सत्यशोधक चळवळ वा ओबीसी चळवळ खतम करण्याची परंपरा मराठ्यांनी आजतागायत चालू ठेवलेली आहे. २०१४ साली महाराष्ट्रात व केंद्रात पेशवाई स्थापन झाली आणी मराठ्यांच्या या घुसखोरीला सत्ताधारी ब्राह्मणांचा आशिर्वाद मिळाला. दरम्यान एक अत्यंत दुःखद व संतापजनक घटना घडली. २०१५ साली अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी गावात एका मराठा मुलीचा बलात्कार करून खून करण्यात आला. या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला. दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लीम अशा सगळ्याच समाजघटकातून या घटनेचा निषेध करण्यात आला. परंतू सत्ताधारी ब्राह्मण-मराठ्यांच्या मनात वेगळेच षडयंत्र शिजत होते.

कोणताही गंभीर गुन्हा घडल्यानंतर कोणीही सूज्ञ व्यक्ती एकच मागणी करतो- आरोपींना शिक्षा झाली पाहिजे व पिडित व्यक्तीला न्याय मिळाला पाहिजे. आणी हे काम शासन-प्रशासन करीत असते. त्यामुळे एखाद-दुसरा मोर्चा काढून स्थानिक शासन-प्रशासनावर दबाव आणून हे काम करून घेता येते. अर्थात कोपर्डीची पिडित मुलगी ही सत्ताधारी जातीतील असल्याने मराठा जातीतील आमदार-खासदार-मंत्री हे काम फोनवरून शासन-प्रशासनावर दबाव आणून शकले असते व पिडीत मुलीला न्याय मिळवून देऊ शकले असते. मोर्चे, धरणे वगैरेची अजिबात गरज नव्हती.

परंतू सत्ताधारी मराठा व ब्राह्मण नेत्यांनी या घटनेचा गैरफायदा घेण्याचे ठरविले. पिडीत मुलीच्या घरासमोर अचानक मराठा मेळावे भरू लागलेत. पिडीत मुलीला न्याय देण्याची मागणी मागे पडली आणी अचानक मराठा आरक्षणाची मागणी व एट्रॅसिटी कायदा रद्द करण्याची मागणी पुढे आली. या दोन्ही मागण्यांचा घडलेल्या बलात्कार प्रकरणाशी काही एक संबंध नव्हता. परंतू तरीही या मागण्यांना पाठींबा देण्यासाठी सर्वप्रथम शरद पवार कोपर्डी गावात पोहचलेत. (जरांगेला पाठींबा देण्यासाठी सर्वप्रथम शरद पवारच गेले होते, हे येथे फक्त लक्षात आणून देतो.) त्यानंतर मराठा आमदार, खासदार, मंत्री यांची कोपर्डीच्या रस्त्यावर रीघ लागली. मुख्यमंत्री फडणवीस अक्षरशः धावून गेलेत व मागण्यांना पाठींबाही दिला.

दलित मुलीवरील अत्याचाराचे खैरलांजी प्रकरण दलित नेत्यांनी कीती गंभीर घेतले हा संशोधनाचा विषय ठरेल. मात्र मराठा मुलीवरील अत्याचाराने अती दुःखी झालेले दलित नेते कोपर्डीला भेट द्यायला अधीर झालेले होते. यात मुख्यतः माननीय नामदार रामदास आठवले व आणखी एक दिग्गज दलित नेते हे अग्रेसर होते. तेव्हा कोपर्डी गावातील मराठ्यांनी जाहीर फतवा काढला व दलित नेत्यांना कोपर्डी गावात प्रवेश नाकारला. दलितांची सावलीच काय, त्यांची सहानुभूतीही आम्हा मराठ्यांना चालणार नाही मनुस्मृतीतील या आधूनिक श्लोकाचा निषेध एकाही मराठा विद्वानाने, एकाही मराठा नेत्याने केला नाही. मराठा जातीतील विद्वान, बुद्धीवान, विचारवंत म्हणून मिरविणारे व दलित-ओबीसींच्या स्टेजवर जाऊन भाषणे ठोकणारे हे मराठा विद्वान "जातीसाठी माती' खातांना स्पष्टपणे दिसत होते.

दलित-ओबीसी द्वेषाचा हा मराठा-वणवा कोपर्डी गावातून महाराष्ट्रभर कसा पोहचेल व मणीपूरच्या आधी फुलेशाहूआंबेडकरांचा महाराष्ट्र कसा जातीय वणव्यात उध्वस्त होईल, यासाठीचे बारभाई कारस्थान पेशव्यांच्या नागपूरी राजधानीत शिजवण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक तालुक्यात मराठ्यांचे लाखांचे मोर्चे काढून दलित-ओबीसींमध्ये दहशत निर्माण करण्याचे ठरले. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील संपूर्ण शासन-प्रशासनाची फौज व संघ-भाजपाची हाफ चड्डीतील फौज कामाला जुंपली गेली. हे निगेटिव्ह जातीय धृवीकरण प्रतिक्रांतीचे मैदान ठरले. ओबीसी आरक्षण व एट्रॉसिटी कायदा जोपर्यंत अस्तित्वात आहे, तोपर्यंत मनुस्मृती अमलात येऊ शकत नाही, हे मनुवाद्यांना पुरते ठाऊक आहे.

फुलेशाहूआंबेडकरांनी महत्प्रयासाने महाराष्ट्राची पुरागामी जडणघडण तयार केली होती, ती पूर्णपणे उध्वस्त करण्याचे काम या मराठा मोर्च्यांकडून पेशव्यांनी करून घेतले. कुठेही काही अत्याचार झाला की अत्याचार करणारा कोण जातीचा आहे व पिडीत कोणत्या जातीचा आहे, हे पाहूनच जातवार निषेध पत्रके व समर्थन पत्रके निघायला लागलीत. होय! अत्याचारी माणसांचे समर्थन करणारी जात-पत्रके यापूर्वी कधीही निघत नव्हती, ती या मराठा मोर्च्यांमुळे निघायला लागली. फुलेशाहूआंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात एकमेकांची जात विचारणे अनैतिक मानले गेले होते. मराठा मोर्च्यानंतरच्या महाराष्ट्रात उघडपणे जात विचारणे व सांगणे अभिमानास्पद वाटू लागले. "नाद करायचा नाही', "हम भी आये लाखोमें' असे जातीय उन्मादाचे स्टिकर मोटार-गाड्यांवर व मोटारसायकलींवर चमकायला लागलेत. त्याची प्रतिक्रिया सोशल मिडियावर उमटू लागली. दलित-ओबीसींकडून "एक मराठा, लाख खराटा' व "आला मराठा, करा उफराटा' अशी प्रतिउत्तरे मिळू लागलीत. ब्राह्मण-मराठ्यांच्या या संयुक्त पेशवाई प्रतिक्रांतीला त्या काळात कोणी विरोध केला, कसा विरोध केला व कोणती मैदानी लढाई लढावी लागली याचा तपशील आपण लेखाच्या चौथ्या पर्वात घेऊ या!

तो पर्यंत जयजोती! जयभीम !! सत्य की जय हो!!!

**-प्रा. श्रावण देवरे**

संस्थापक-अध्यक्ष,

ओबीसी राजकीय आघाडी,

संपर्कः ८८३०१ २७२७०

B©_ob... obcparty@gmail.com

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत

**गोंदिया:** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत अर्ज करतांना तालुक्यात काही बिगर शासकीय व्यक्ती शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी करुन अर्ज मंजूर करुन आणण्याची हमी देतात. अर्ज करणे व अर्ज मंजूर होण्याच्या प्रक्रियेदरम्यान कोणत्याही बिगर शासकीय व्यक्तीचा समावेश नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी अर्ज मंजूर करुन देण्याच्या कोणत्याही आमिषाला बळी न पडता कृषि विभागाचे मार्गदर्शन घेऊन सदर योजनेअंतर्गत अर्ज सादर करावे, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी गोंदिया पवन मेश्राम यांनी केले आहे.शेतात काम करीत असतांना अपघात घडून आल्यास उदा. विषबाधा, विजेचा धक्का, वीज पडून मृत्यू, सर्पदंश, खुन, उंचावरुन पडून मृत्यू, नक्षलवाद्यांकडून होणाऱ्या हत्त्या, जनावरांच्या हल्लयामुळे किंवा चावल्यामुळे होणारे अपघाती मृत्यू इत्यादी बाबी समाविष्ट आहेत.

## महायुतीचा धर्म पाळण्यासाठी सज्ज व्हा-राजेंद्र जैन

**गोंदिया:** आगामी विधानसभा व नगर परिषदेच्या निवडणुकीत महायुतीचा धर्म पाळत खा. प्रफुल्ल पटेल हे जो निर्णय घेती, त्या निर्णयाशी खंबीरपणे उभे राहू संघटन मबजूत असेल तर पक्ष मजबूत असतो, त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या दोन्ही निवडणूक या आपल्यामधूनच लढायच्या आहेत. शहरात अनेक समस्या आहेत. त्य जनतेच्या निदर्शनास आणून द्या. जनतेची छोटी-मोठी कामे कराव, पक्षाशी लोकांना जोडण्याचे कार्य करा, असे प्रतिपादन माजी आ.राजेंद्र जैन यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांची बैठक शुक्रवारी स्थानिक रेलटोली येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. प्रदेश सचिव विनोद हरिणखेडे,



जिल्हाध्यक्ष प्रेम रहांगडाले, शहर अध्यक्ष नानू मुदलियार यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक पार पडली. बैठकीला प्रभागातील पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी पक्ष संघटन व विस्तारासंबंधी चर्चा करण्यात आली.

खा. प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करुन आगामी विधानसभा व नगर परिषद निवडणुकीत समर्पण वृत्तीने काम करण्याची ग्वाही कार्यकर्त्यांनी दिली. राजेंद्र जैन म्हणाले, महायुती सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना उच्च शिक्षणात मोफत शिक्षण, एसटी बसमध्ये ५० टक्के सवलत, धानाला बोनस, गोंदिया येथे मेडिकल महाविद्यालय, गोंदिया व आसपासच्या परिसरातील जनतेला प्रवासाच्या सुविधेकरिता विविध कामे पक्षाने केली आहेत.

## काँग्रेसच्या विधानसभा समन्वयकांची नियुक्ती, गोंदियात राजकुमार पटले यांना जबाबदारी



**गोंदिया :** लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर विधानसभा निवडणुकीचे वारे सुरू झाले आहेत. त्या अनुसंगाने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सुचनेनसार महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या आदेशावरून गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील विधानसभा समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून गोंदिया विधानसभा क्षेत्राची जबाबदारी कृउबास उपसभापती राजकुमार पटले यांना देण्यात आली आहे.

सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीला घेवून मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्यातच भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रात काँग्रेसने मारलेली बाजी ही कार्यकर्त्यांना स्फुर्ती देणारी ठरली आहे. त्या अनुसंगाने विधानसभा निवडणुकीच्या मोर्चेबांधणीसाठी समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली असून अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रासाठी प्रमोद पाऊलझगडे, तिरोडा विधानसभासाठी डॉ.झामसिंग बघेले व जागेश्वर निमजे, गोंदिया विधानसभा क्षेत्रासाठी राजकुमार पटले तर आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे उषा मेंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समन्वयक विधानसभा मतदार संघाचा दौरा करून जिल्हाध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी व विविध आघाड्यांची बैठक घेवून निवडणुकीची रणनिती तयार करणार आहेत.

# महाराष्ट्राला "मार्वल"च्या माध्यमातून मिळणार आता कृत्रिम बुद्धीमत्तेची साथ...

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धीमत्ता किंवा एआय हा सध्या तंत्रज्ञानातील सर्वात लोकप्रिय शब्दांपैकी एक झाला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने केला तर मानवाचे जीवन सुकर होऊ शकते. याच उद्देशाने आता जगभर विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्र पोलीस दलालाही आता "मार्वल' कंपनीच्या स्थापनेमुळे गुन्ह्यांची उकल गतीने करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेची जोड मिळाली असून भविष्यात सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी महाराष्ट्राला याचा मोठा लाभ मिळणार आहे.

मागील काही वर्षांत कृत्रिम बुद्धीमत्तेच्या माध्यमातून अनेक नवकल्पना निर्मित होऊन प्रगती साधली जात आहे. अनेक वर्षांपूर्वी ज्या बाबी कल्पनेबाहेरच्या वाटत होत्या त्या वैज्ञानिक सिद्धांताद्वारे मान्य होऊन हळूहळू वास्तविकतेत रूपांतरित झाल्या. त्याचेच आजचे आधुनिक स्वरूप म्हणून आपण कृत्रिम बुद्धीमत्तेकडे पाहू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवाप्रमाणे विचार करण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी तयार केलेल्या संगणकामधील मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण म्हणता येईल. शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे, समज आणि भाषेचे आकलन ही सर्व या संगणकीय क्षमतांची उदाहरणे म्हणता येतील. संगणक, संगणक-नियंत्रित रोबोट किंवा सॉफ्टवेअर बनवण्याची एक पद्धत आहे जी मानवी मन आणि बुद्धीप्रमाणे विचार करते. मानवी मेंदूचा अभ्यास करून आणि माहितीचे विश्लेषण करून त्याचे परिणाम दर्शविते.

वास्तववादी आणि उच्च गुणवत्तेच्या प्रतिमा, व्हिडीओ आणि ऑडिओ तयार करण्यासाठी सुमारे एक दशकापूर्वी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर भारतात होऊ लागला. त्यासोबतच गुगल एआय, चॅट-जीपीटी आदी माध्यमातूनही याचा वापर वाढू लागला आहे. त्याचप्रमाणे सिरी किंवा अलेक्सा ही नावे सुद्धा परिचित झाली आहेत. या मशीन्स सुद्धा मर्यादित स्वरुपात कृत्रिम बुद्धीमत्तेचा भाग म्हणता येतील. मानवाप्रमाणे विचार करण्याची कृत्रिम बुद्धीमत्तेची क्षमता सिद्ध होऊ लागली आहे. सध्या चॅटबॉट्सने जगात वादळ आणले आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात डेटाचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले आहे. मोठमोठ्या कंपन्या दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि कामगारांना मदत करण्यासाठी याची मदत घेत आहेत. मानवी आकलनशक्ती आणि तर्कावर आधारित निर्णय घेण्याच्या क्षमतेच्या जोरावर जटील समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर केला जाऊ लागला आहे. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस दलाला याचा मोठा लाभ होऊ शकणार आहे.

सद्यस्थितीत शासनाच्या विविध विभागांकडे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असते. पोलीस दलाकडे गुन्हे आणि गुन्हेगारांसंबंधी माहिती मोठ्या प्रमाणावर येत असते. सायबर आणि आर्थिक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या संख्येतही मोठी वाढ होत असून नागरिकांच्या फसवणुकीचे नवनवीन मार्ग अवलंबिले जात आहेत. यात गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्हेगारांची संख्या देखील मोठी असते. प्रत्येक बाबीत विविध प्रकारे मानवी मेंदूच्या क्षमतेचा वापर करून आणि उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून गुन्ह्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि या माहितीचा वापर करून विश्लेषण करायला आणि मनुष्याप्रमाणे निर्णय घ्यायला



आधुनिक संगणकालाच शिकविले तर याचा मोठा लाभ होऊ शकतो. हाच धागा पकडून महाराष्ट्र पोलीस दलात एआयचा वापर करण्यासाठी स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन करुन पोलीस दलाला या कृत्रिम बुद्धीमत्तेची मदत मिळवून देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने १६ मार्च २०२४ च्या बैठकीत घेतला आणि त्या अनुषंगाने तातडीने पावले उचलून "मार्वल' कंपनीची स्थापना करण्यात आली.

कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करुन गुप्तवार्ता क्षमता भक्कम करण्यासाठी आणि अपराधांचा पूर्वानुमान लावण्याची क्षमता वाढविण्यासाठी तसेच राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी राज्यात "Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement (MARVEL)"मार्वल' ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे. कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अशा प्रकारचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कंपनीस शासनामार्फत ४ कोटी २० लाख रुपये प्रतीवर्ष याप्रमाणे पाच वर्षांकरिता १०० टक्के भागभांडवल देण्यात येणार असून भागभांडवलाचा पहिला हप्ता नुकताच वितरीत करण्यात आला आहे.

"मार्वल'स्थापन करण्याबाबत राज्य शासन, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर आणि मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. यांच्यात दि.२२ मार्च २०२४ रोजी त्रिपक्षीय करार करण्यात येऊन शासनाची ही कंपनी अधिनियम २०१३ खाली नोंदणीकृत करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्यासमोर पोलीस जिमखाना येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत राज्याच्या मुख्य सचिव तथा गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव (अतिरिक्त कार्यभार) सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याबाबतचे सादरीकरण करण्यात आले.

पोलीस दलाला कृत्रिम बुद्धीमत्तेची जोड मिळाल्याने मशीनला माहितीचे विश्लेषण करून आणि मानवाप्रमाणे विचार करायला शिकवून गुन्ह्यांची उकल करण्यासाठी तसेच होणारे गुन्हे रोखण्यासाठी मोठा लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर गुन्हेगारांची गुन्हे करण्याची पद्धत जाणून, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून कुठे गुन्हा घडू शकतो, कुठे कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते आदी बाबींचे अनुमान आधीच लावता येऊ शकणार आहे.

या उपक्रमातील मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. ही चेन्नई स्थित कंपनी असून त्यांना भारतीय नौदल, गुप्तवार्ता विभाग, आंध्र प्रदेश, आयकर विभाग, सेबी आदी संस्थांना एआय सोल्युशन्स पुरविण्याचा अनुभव आहे. त्याचबरोबर नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या विशेषज्ञतेचा उपयोग व्हावा या उद्देशाने "मार्वल' चे कार्यालय नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या आवारात आहे. पोलीस दलाच्या मागणीनुसार "पिनाका' एआय सोल्युशन्स पुरवेल तर, भारतीय व्यवस्थापन संस्था संशोधन आणि प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणार आहे. नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर चे संचालक हे या कंपनीचे पदसिद्ध संचालक असतील आणि मे.पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या.चे संचालक हे या कंपनीच्या संचालक मंडळावर असणार आहेत. तर नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक हे पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी असतील.

देशात नावलौकिक असणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाची कार्यक्षमता कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापरामुळे आणखी वाढणार असून सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची उकल तातडीने होण्यासाठी हातभार लागेल, यात शंका नाही. ङ्गमार्वलफ थेट शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणार आहे. त्यामुळे भविष्यात शासनाच्या इतर विभागांनाही कृत्रिम बुद्धीमत्तेचा लाभ मिळून महाराष्ट्र आणि पर्यायाने भारत देश विविध क्षेत्रात जगभरात अग्रेसर राहील, हे निश्चित.

**-ब्रिजकिशोर झंवर**

वरिष्ठ सहायक संचालक

माहिती व जनसंपर्क

महासंचालनालय.

# गाव विकासात महिलांचे योगदान महत्वाचे-अतिरिक्त मुकाअ लोखंड

## * संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय तपासणी समितीद्वारे तपासणी
## * गंगाझरी, नहरटोला, तुमखेडा(बु.), शिवणी ग्रामपंचायतींची केली तपासणी



**गोंदिया:–** घराच्या प्रगतीसाठी त्या घराच्या महिलेचे योगदान जसे महत्त्वपूर्ण ठरते, त्याचप्रमाणे जर गावाचा संपूर्ण विकास साधायचा असल्यास त्या गावांतील महिलांचे योगदान हे अत्यंत महत्त्वाचे असते, असे प्रतिपादन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे यांनी दिनांक ९ जुलै रोजी नहरटोला येथे बचतगटांच्या महिलांना मार्गदर्शन करताना केले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा अन्वये जिल्हास्तरीय तपासणीच्या अनुषंगाने गोंदिया तालुक्यातील ग्रामपंचायत गंगाझरी, तिरोडा तालुक्यातील नहरटोला, गोरेगांव तालुक्यातील तुमखेडा तसेच आमगाव तालुक्यातील शिवणी या ग्रामपंचायतींची जिल्हास्तरीय तपासणी समितीच्या वतीने दिनांक ९ जुलै रोजी तपासणी करण्यात आली.

यावेळी जिल्हास्तरीय तपासणी समिती अध्यक्ष म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे, समिती सदस्य सचिव म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता आनंदराव पिंगळे, समिती सदस्य प्रतिनिधी आरोग्य विभागाचे जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, स्वच्छ भारत मिशन जिल्हा कक्षाचे शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार भागचंद्र रहांगडाले, महिला व बालकल्याण विभागाचे प्रतिनिधी म्हणून बाल विकास प्रकल्प अधिकारी विनोद चौधरी, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे प्रतिनिधी रियाज शेख, अभियंता राजेंद्र सतदेवे, अभियंता आशिष अडमे उपस्थित होते.

यावेळी प्रामुख्याने गंगाझरी येथे जिल्हा परिषद सदस्या अश्विनी ताई पटले, पंचायत समिती सदस्या वंदना प्रकाश पटले, समूह समन्वयक कांचन मेश्राम, तिरोडा तालुक्यातील नहरटोला येथे गटविकास अधिकारी सतीश लिल्हारे, पंचायत समिती उपसभापती हुपराज जमाईवार, विस्तार अधिकारी (पंचायत) शितेश पटले, बाळू भाऊ भगत, समूह समन्वयक अनुप रंगारी, गोरेगांव तालुक्यातील तुमखेडा येथे गटविकास अधिकारी शुभम जाधव, सहायक गटविकास अधिकारी एच.व्ही. गौतम, विस्तार अधिकारी जयप्रकाश बोरकर, विस्तार अधिकारी चुंचूनवार, गटसमन्वयक सुभाष बोहरे, समूह समन्वयक नीलकमल डहाट, आमगाव तालुक्यातील शिवणी येथे जिल्हा परिषद सदस्या छबूताई उके, गटविकास अधिकारी अरुण गिरहेपुंजे, विस्तार अधिकारी कुटे, के.एम. रहांगडाले, गट समन्वयक गांधी पटले उपस्थित होते.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सन २०२३–२४ अंतर्गत ५३ जिल्हापरिषद गटातून प्रथम आलेल्या ५३ ग्रामपंचायतीमधून गुनानुक्रमे ९ ग्रामपंचायतींची तपासणी जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून करण्यात आली. यात सालेकसा तालुक्यातील दर्रेकसा, देवरी तालुक्यातील सावली, अर्जुनी मोरगाव तालुक्यातील देवलगांव, सिलेझरी, सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा, गोरेगांव तालुक्यातील तुमखेडा बु., आमगाव तालुक्यातील शिवनी, गोंदिया तालुक्यातील गंगाझरी तसेच तिरोडा तालुक्यातील नहरटोला या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ग्रामपंचायतीपैकी जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या तसेच तीन विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय प्रथम पारितोषिक ६ लाख, द्वितीय ४ लाख तर तृतीय पारितोषिक ३ लाखांचे देण्यात येणार आहे. विशेष पुरस्कार म्हनून प्रत्येकी ५० हजारांचे पुरस्कार रक्कम देण्यात येणार आहे.

नहरटोला येथे बचतगटाच्या माध्यमातून महिलांनी लघु उद्योग सुरू केला असून दुधापासून पनीर बनविण्याचे काम त्यांनी हाती घेऊन गाव विकासाला चालना देण्याचे काम केले आहे.

त्याचप्रमाणे शिवणी येथील बचतगटांच्या महिलांनी ही लघु उद्योगाच्या माध्यमातून गाव विकासात मोलाचे योगदान देत आहेत. यावेळी त्यांच्याशी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. तानाजी लोखंडे व उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता आनंदराव पिंगळे यांनी संवाद साधत गाव स्वच्छ व सुंदर करण्यासाठी महिलांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. तपासणी दरम्यान पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, गाव परिसर स्वच्छता आदी घटकांची तपासणी करण्यात आली.

शाळा व आंगणवाडी मधील शौचालय स्थिती, पिण्याच्या पाण्याची सोय, परिसर स्वच्छता या घटकांच्या अनुषंगाने तपासणी करून मूल्यांकन करण्यात आले.

# लैंगिक छळ करून आक्षेपार्ह व्हिडीओ व्हॉयरल

गोंदिया : सोशल मिडीयाच्या माध्यमातून मैत्री जुळवून आरोपीने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तसेच तिच्यावर वारंवार अत्याचार करून लैंगिक छळ केला. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने त्या अल्पवयीन मुलीचे काढलेले आक्षेपार्ह व्हिडीओ व्हॉयरल केले. या संदर्भात फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी दैनिक शेळके (२२) रा. सुंदरनगर गोंदिया याच्याविरूध्द गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली आहे.माहितीनुसार, सोशल मिडीयाचा गैरवापर काही नविन गोष्ट नाही. यामाध्यमातून अनेक युवक–युवतींची फसवणूक केली जात आहे. यासाठी नवनविन प्रकार शोधले जातात. वाढत्या घटनांवरून सोशल मिडीयाचा वापर चिंतनाचा विषय ठरला आहे. असाच प्रकार गोंदिया शहरात उघडकीस आला आहे. गोंदियातील आपल्या आजीकडे लहानपणापासून राहणारी १७ वर्षाची पिडीत ही महिभाभरापूर्वी नागपूर येथे राहायला गेली. गोंदियात आपल्या आजीकडे असतांना त्या मुलीच्या आयडीवर आरोपी दैनिक शेळके (२२) रा. सुंदरनगर गोंदिया याने इंस्टाग्राम आयडीवर त्याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली. त्याची फ्रेंड रिक्वेस्ट तिने स्विकारली.

त्या दोघांची इंस्टाग्रामवरच चांगलीच मैत्री झाली. पाहता–पाहता दोघांचे मैत्रीतून प्रेमात रूपांतर झाले. यातूनच त्या दोघांत शारीरीक संबध प्रस्तापीत झाले. त्याने त्या मुलीचे अनेकदा शारीरीक शोषण झाले. त्या दोघांची आक्षेपार्ह व्हीडीओ काढून दैनिक शेळके याने युट्यूबवर प्रसारीत करून तिची बदनामी केली. या घटनेसंदर्भात गोंदिया शहर पोलिसात भादंविच्या कलम ३७६ (२) (एन) ३२३, ५०४, ५०६, सहकलम ४, ६, ८, १२ बाललैंगीक अत्याचार अधिनियम न्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गराड करीत आहेत.



आरोपी दैनिक शेळके याने त्या १७ वर्षाच्या मुलीला १ मार्च २०२४ ला संदुर नगरच्या चौकी येथे बोलावून सुंदरनगरातील लाल बंगल्यात घेऊन गेला. त्याने तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर अनेकदा त्याने तिच्यावर अत्याचार केला. त्यातच ५ जुलै २०२४ रोजी दैनिक शेळके याने तिला कुडवा परिसरातील डॉमीनोजच्या समोरील एका घरी तिला बोलाविले. त्या दोघांचे पैश्यावरून तिथे वाद झाला. यावरून आरोपीने तिला शिविगाळ करीत मारहाण केली. या वादातून संतापलेल्या दैनिक शेळके याने तिच्यासोबत आक्षेपार्ह काढून ठेवलेले व्हीडीओ व्हायरल केले. आणि फिर्यादीने पोलिस ठाणे गाठून याची तक्रार केली. आणि घटनेचे बिंग फुटले.

आरोपी दैनिक शेळके व अल्पवयीन मुलगी यांच्या मागील एक वर्षापासून प्रेम प्रकरण होते. या प्रेमप्रकरणातूनच लैंगीक शोषण झाले. या प्रकरणाला घेवून पिडीत मुलीने बर्डी पोलिस ठाणे गाठून आपबिती सांगितली. यानंतर पोलिसांनी गुन्हा नोंद करून गुन्हा गोंदिया शहर पोलिसांकडे वर्ग केला. आरोपी दैनिक शेळके याला अटक करून पोलिसांनी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची रवानगी तुरूंगात केली आहे.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत एकही पात्र लाभार्थी सुटता कामा नये– जिल्हाधिकारी

गोंदिया – ‍मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण‍ ही शासनाची महत्वाकांक्षी लोककल्याणकारी योजना असून या योजनेत पात्र होणा?या प्रत्येक स्त्रीची नोंदणी करण्याची महत्वाची जबाबदारी सर्व संबंधितांची आहे. एकही पात्र लाभार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी दिले. आज मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली योजनेचा आढावा घेण्यात आल्यानंतर त्यांनी सर्व यंत्रणांना मार्गदर्शन केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. आता ‍नारी शक्ती दूत‍ ?पच्या माध्यमातून सामान्य महिला देखील अर्ज भरू शकते. ?पमध्ये अर्ज भरताना अडचण आल्यास नजीकच्या अंगणवाडी केंद्रात देखील अर्ज भरून द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

# बंगालींना दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र मिळावे

## बडोले यांने फडणवीसांना निवेदन, मुख्य सचिवांशीही चर्चा, पुनर्वसित बंगालींचे अनेक प्रश्न प्रलंबित



**अर्जुनी मोरगाव:** महाराष्ट्र राज्यातील पुर्नवसित बंगाली बांधवांचे नमोशुद्र पौंड, पौंडक्षत्रीय राजवंशी या उपजातींना पूर्ववत जातीचे सवलती सुरु करावय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था मार्फत पूर्ण झालेल्या सर्वेक्षणाचे अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात यावे. बंगाली पुनर्वसित आर्थिक दुर्बल घटकाचे (ईडबल्यूएस) प्रमाणपत्र देण्यात यावे, यासाठी माजी सामाजिक न्याय मंत्री बडोले यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. तसेच राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांचीही मंत्रालयात भेट घेऊन निवेदन दिले व चर्चा केली.

महाराष्ट्र राज्यात गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यात बंगाली बांधवांना स १९६४ ते १९७१ पर्यंत केंद्र सरकारकडून पुनर्वसन देण्यात आले. केंद्र शासनाच्या आदेशान्वये महाराष्ट्र शासनातर्फे १९६४ ते १९८१ पर्यंत नमोशुद पौंड, पौंड क्षत्रिय राजवंशी व उपाजातींना संविधानाने (अनु.जाती) आदेश १९५० (भाग १) अधिनियम व आदेशानुसार अनुसूचित जातीचे सवलत मिळत होती. नंतर १९८१ मध्ये केंद्र शासनाचे पुनर्वसन विभागाने राज्य शासनाकडे हस्तांतरण केले. तेव्हापासून शासनाकडून बंगाली बांधवांना अनु. जातीचे सवलत देणे बंद केले. कारण राज्य शासनाने अनु. जातीच्या यादीमध्ये नमोशुद्र, पौंड, पौंड क्षत्रिय, राजवंशी यांचा समावेश नाही. त्याबाबतचा पाठपुरावा समितीतर्फे निवेदनाद्वारे केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडे वारंवार करण्यात आला आहे.

सामाजिक न्याय विभागाने आदेश क्रमांक २०१६/१३२००१–एस.सी.डी. (आर–आय.सी.एल.एल.) तारीख ७–१०–२००३ अन्वये राज्य शासन नमोशुद्र, पौंड, पौंडक्षत्रिय, राजवंशी या जातीचा सर्वेक्षण करुन सवलत सुरु करण्याचे आदेश दिले. परंतु त्या आदेशाचे राज्य शासनातर्फे कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. परिणामी बंगाली बांधवांचा अजूनही शैक्षणिक, सामाजिक तथा आर्थिक विकास झालेला नाही.

एखाद्या जातीचे लोक देश तथा राज्य बदलत असते किंवा स्थानांतरण झाले तेव्हा त्यांची जात बदलत नसते. म्हणून बंगाली बांधवांचे नमोशुद्र, पौंड, पौंडक्षत्रिय, राजवंशी या उपजातींना राज्याच्या अनुसूचित जातीच्या यादीमध्ये समाविष्ट करुन पूर्ववत करुन सवलत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.


## ग्रामपंचायत कार्यालय मोरगाव
## पंचायत समिती अर्जुनी/मोर. जि.गोंदिया
## जाहीर निविदा सुचना

ग्रामपंचायत मोरगाव पं. समिती अर्जुनी/मोर. जि. गोंदिया १५ वा वित्त आयोग अंतर्गत नियोजन आराखड्यातील खालील मंजूर बांधकामाचे जि. प. बांधकामाचे जि. प. बांधकाम विभागाकडे यथा योग्य श्रेणीत पंजीबध्द असलेल्या कंत्राटदारांकडून शेकडेवारी पद्धतीने पूर्ण बांधकामाचे दरपत्रक निविदा मागविण्यात येत आहे. दरपत्र निविदेचा विस्तृत नमुना ग्रा.प. च्या नोटीस बोर्डावर दि. ११/०७/२०२४ पासुन उपलब्ध आहे.

**कामाचे विवरण**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम लक्ष | अनामत रक्कम | काम करण्याचा कालावधी | कोरी निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिमेंट नाली बांधकाम | १.३० | १ % | ६ महिने | २००/– |
| २ | सिमेंट नाली बांधकाम | १.३० | १ % | ६ महिने | २००/– |
| ३ | बंदिस्त नाली बांधकाम | १.५० | १ % | ६ महिने | २००/– |
| ४ | ओटे व तोंडी विहीर दुरुस्त करणे | १.०० | १ % | ६ महिने | २००/– |
| ५ | नवीन हातपंप बांधकाम करणे | २.५० | १ % | ६ महिने | २००/– |
| ६ | नवीन हातपंप बांधकाम करणे | १.२५ | १ % | ६ महिने | २००/– |

दरपत्रक जाहीर निविदा सूचना पध्दतीचा तपशील
१.दरपत्रक निविदा प्रसिद्धी व दाखल करण्याची सुरवातीचा दिनांक दि. १२/०७/२०२४ सकाळी ११.०० वाजता २.दरपत्रक निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक १७/०७/२०२४ सायंकाळी ४.०० वाजता
३.निविदा उघडणे ( शक्य झाल्यास )सरपंच /ग्रामसेवक ग्रा.प. मोरगाव दि. १८/०६/२०२४ दुपारी १२.०० वाजता दरपत्रक निविदा उघण्यात येईल.

**ग्रामसेवक** — **ग्रामपंचायत कार्यालय मोरगाव**
**सरपंच** — **ग्रामपंचायत कार्यालय मोरगाव**


# कुटूंबाचे उत्पन्न ८ लाख असेल तर जिल्ह्यात मुलींना मोफत उच्च शिक्षण

## शासनाचा निर्णय: जिल्ह्यातील हजारो विद्यार्थिनींना होणार लाभ, गोरगरीब विद्यार्थिनींना होणार मदत

**गोंदिया:** व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्लूएस), सामाजिक व शैक्षिणकदृष्ट्या मागास प्रवर्ग (एसईबीसी) तसेच इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये ५० टक्क्यांऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्कासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षणाचा लाभ मिळणार आहे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यवसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणाअंतर्गत आर्थिक पाठबळाअभावी



व्यवसाजिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून राज्यातील मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांनी मुलींना उच्चशिक्षण मोफत देण्याची घोषणा केली होती. या निर्णयाला मंत्रीमंडळाची यासंदर्भातील शासन निर्णयाला मान्यता मिळाली असून सोमवारी जारी करण्यात आला आहे. हा लाभ शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून लागू असणार आहे.

### वार्षिक उत्पन्न आठ लाखा किंवा त्यापेक्षा कमी

**शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत ही कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित, तसेच पुर्वीपासून प्रवेशित असलेल्या मुलींना मिळणार आहे. तसेच महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय ६ एप्रिल २०२३ मध्ये नमूद केलेल्या संस्थाचालक व संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुद्धा लाभ देण्यात येणार आहे.**

### कशासाठी व कोठे मिळेल मोफत प्रवेश

**शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत व विद्यापीठे व सार्वजनिक विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यवसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून प्रवेश मिळणार आहे.**

### यापुर्वी होती ५० टक्के सवलत

**ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित, तसेच पुर्वीपासून प्रवेशित असलेल्या मुलींना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.**

### आमगाव–सालेकसा पुलावरील जड वाहतूक बंद

**गोंदिया :** जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा राज्य मार्ग ३३५ वरील कि.मी. २३८/२०५ मधील पुलाच्या स्ट्क्चरल ऑडिट हे व्हीएनआयटी नागपूर यांनी १६ मे २०१८ रोजी केले असून स्ट्क्चरल ऑडिट अहवाल सादर केला आहे.

या अहवालात दिलेल्या निर्देशानुसार पुलावरील जड वाहतुक त्वरित बंद करणे गरजेचे असून या पुलावरील वाहतूक पर्यायी रस्त्याने वळविणे गरजेचे असल्याचे तसेच सदर पुल जास्त धोकादायक झाल्याने पुलावरील जड वाहतूक त्वरित थांबवून पर्यायी रस्त्याने वळविणे आवश्यक असल्याचे एका पत्रान्वये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गोंदिया यांनी कळविले आहे.


## कार्यालय ग्रामपंचायत बलमाटोला
## पंचायत समिती गोंदिया, जिल्हा परिषद, गोंदिया
## ई-निविदा सुचना (पहली वेळ)

ई–निविदा क्र.०१ जा.क्र.पा.बलमाटोला/ई–निविदा१५/०७/२०२४
दिनांक–१५/०७/२०२४

कार्यालय ग्रामपंचायत बलमाटोला, पंचायत समिती गोंदिया जिल्हा परिषद गोंदिया कडून ह्या द्वारे सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, सदर ग्रामपंचायतमध्ये सन २०२४–२५ ह्या आर्थिक वर्षात विविध विकास कामे करणे अंतर्गत विविध योजनाच्या बांधकामे करण्याकरिता संबंधित साहित्य पुरवठा धारक पुरवठा करण्यासाठी व्दि लिफाफा पद्धतीने खालील साहित्य पुरवठा करण्याकरिता ई–निविदा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहेत.

**सदर ई–निविदा प्रसिद्धी दि.**१५/०७/२०२४ पासून दि.२२/०७/२०२४ ला दुपारी ०५.०० पर्यंत भरता येईल.

**सदर ई–निविदा दिनांक** २३/०७/२०२४ ला दुपारी ०५.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

सदर ई–निविदाची विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्रामपंचायत बलमाटोला पंचायत समिती गोंदिया या कार्यालयास उपलब्ध आहे.

**अटी व शर्ती:** १) निविदा मंजूर झाल्यानंतर कार्यालयासोबत ५००/– रुपये च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. २) अधिक माहितीसाठी कार्यालय **ग्रामपंचायत बलमाटोला येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.**

**(सरपंच)** **ग्रामपंचायत बलमाटोला**
**(ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक** **ग्रामपंचायत बलमाटोला**

## कार्यालय ग्रामपंचायत सोनबिहरी
## पंचायत समिती गोंदिया, जिल्हा परिषद, गोंदिया
## ई-निविदा सुचना (पहली वेळ)

ई–निविदा क्र.०१ जा.क्र.पा.सोनबिहरी/ई–निविदा १५/०७/२०२४
दिनांक–१५/०७/२०२४

कार्यालय ग्रामपंचायत सोनबिहरी, पंचायत समिती गोंदिया जिल्हा परिषद गोंदिया कडून ह्या द्वारे सर्व संबंधितांना सुचित करण्यात येते की, सदर ग्रामपंचायतमध्ये सन २०२४–२५ ह्या आर्थिक वर्षात विविध विकास कामे करणे अंतर्गत विविध योजनाच्या बांधकामे करण्याकरिता संबंधित साहित्य पुरवठा धारक पुरवठा करण्यासाठी व्दि लिफाफा पद्धतीने खालील साहित्य पुरवठा करण्याकरिता ई–निविदा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहेत.

**सदर ई–निविदा प्रसिद्धी दि.**१५/०७/२०२४ पासून दि.२२/०७/२०२४ ला दुपारी ०५.०० पर्यंत भरता येईल.

**सदर ई–निविदा दिनांक** २३/०७/२०२४ ला दुपारी ०५.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

सदर ई–निविदाची विस्तृत माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध असून विस्तृत माहिती ग्रामपंचायत सोनबिहारी पंचायत समिती गोंदिया या कार्यालयास उपलब्ध आहे.

**अटी व शर्ती:** १) निविदा मंजूर झाल्यानंतर कार्यालयासोबत ५००/– रुपये च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करावा लागेल. २) अधिक माहितीसाठी कार्यालय **ग्रामपंचायत सोनबिहरी येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.**

**(सरपंच)** **ग्रामपंचायत सोनबिहरी**
**(ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक** **ग्रामपंचायत सोनबिहरी**

## महाराष्ट्र शासन
## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर
## (महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
## कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया
## सिव्हील लाईन्स, गोंदिया-४४१६०१
## दुरध्वनी क्रमांक-०७१८२-२३७३१५
Email-gndbiid@gmail.com
## अधिक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ, भंडारा
## ई-निविदा सुचना क्र.०५ सन २०२३-२४ (दुसरी वेळ)

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ब–१ नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना ई–निविदेसोबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकाली जाणार नाही. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in वेबसाईटवरती कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची एकुण अंदाजित किंमत (रू.लक्ष) | इसारा बयाना रक्कम (रु.लक्ष) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचे वर्ग | पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाघ प्रकल्पाच्या सिरपुर धरणावर, पुजारीटोला धरणावर, कालीसरार धरणावर व पांढरवाणी उपसा सिंचन योजना वर सुरक्षा रक्षक तैनात करणे | १६.७८ | ०.१७ | ६ महिने (पावसाळा कालावधी धरुन) | रू.२०००/– +जीएसटी ३६०/– एकुण २३६०/– | नोंदणीकृत कंत्राटदाराकरिता (खुला) | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम १९६१ च्या कलम–६ अन्वये नोंदणीकृत/महाराष्ट्र शासनाकडून मंजूर पसारा परवाना (Private Security Agencies Regulation Act 2005 |

१) ई–निविदा उपलब्ध कालावधी:– दिनांक १५.०७.२०२४ ते दिनांक २६.०७.२०२४
२) कार्यस्थळ पाहणी व Geo-tagging दिनांक १५.०७.२०२४ ते दिनांक १९.०७.२०२४
३) ई निविदा उघडण्याचा:– दिनांक २९.०७.२०२४
अ) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
ब) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाचे इलेक्ट्रोनिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
क) या कामाचे अंदाजपत्रक, दर विश्लेषन, मोजमापे, नकाशे इत्यादी कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत.
ड) कामाचा जिल्हा गोंदिया आहे.
इ) सदर कामाचे कार्यारंभ आदेश प्रापणसुची वरीष्ठ कार्यालयाकडून मंजुरी होण्याच्या अटीस अधीन राहून देण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
जा.क्र.१९९८/निलि/२०२४ दिनांक १८/०७/२०२४
कार्यालय, कार्यकारी अभियंता,
बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग गोंदिया

**कार्यकारी अभियंता**
**बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग**
**गोंदिया**

# आपत्ती निवारणासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज रहावे-जिल्हाधिकारी प्रजित नायर

**संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी करा,पुरेसा धान्य व औषध साठा ठेवा, सर्व विभागांनी समन्वय ठेवावा,एसओपी अद्ययावत करा, नियंत्रण कक्ष स्थापन करा**

**गोंदिया :** पावसाळा सुरू झाला असून पावसाचा जोर कधीही वाढू शकतो अशा परिस्थितीत प्रत्येक विभागाने दक्ष राहणे आवश्यक असून जिल्ह्यातील पुरप्रवण गावांचा सुक्ष्म आराखडा तयार करणे आवश्यक आहे. आपत्ती ही कधीही सांगून येत नसते. तयारी न करता ओढवलेल्या आपत्तीचे व्यवस्थापन करणे कठीण असते. पावसाळ्याच्या दिवसात अचानक पूर येणे, धरण फ़ुटणे, रस्ता वाहून जाणे, गाव पाण्याखाली येणे अशा आपत्ती ओढवतात, त्यामुळे सर्व यंत्रणांनी आपत्ती निवारणासाठी सज्ज रहावे अशा सूचना जिल्हाधिकारी प्रजित नायर यांनी यंत्रणांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मान्सून तयारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, अप्पर जिल्हाधिकारी घनश्याम भुगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, पूजा गायकवाड, अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील जुने रस्ते, ईमारत, पूल, शासकीय इमारत, शाळा, महाविद्यालय, धरण व मामा तलाव इत्यादींचे संबंधित यंत्रणेने संरचना तपासणी (स्ट्रक्चरल ऑडीट) करून वापरण्यायोग्य असल्याचे प्रमाणपत्र देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे नदीक्षेत्र व पाणलोट क्षेत्रात असलेले अतिक्रमण तात्काळ काढण्याची कार्यवाही करावी असे जिल्हाधिकारी म्हणाले. प्रत्येक गावात फ़र्स्ट रिस्पॉन्स टीम तयार करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मान्सून कालावधीत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी नियंत्रण कक्ष स्थापन करून तो चोविस तास कार्यरत राहील याची खात्री करावी असे ते म्हणाले.

गोंदिया जिल्ह्यात ९६ गावे पुरप्रवण असून या गावात विशेष उपाययोजना असलेला आराखडा तयार करावा. या गावांसाठी पर्यायी मार्गांची यादी तयार करावी. त्याचप्रमाणे पावसाळ्यात संपर्क तुटणाऱ्या गावांची यादी तात्काळ सादर करावी. मान्सून तसेच आपत्तीच्या वेळेस कार्य प्रणालीची कार्यपद्धती अद्ययावत करावी असे त्यांनी सांगितले. तालुकानिहाय नियंत्रण कक्ष स्थापन करून नियंत्रण कक्षात पूर्ण कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. त्याचप्रमाणे नगरपालिका व ग्रामपंचायत स्तरावर आपत्ती व्यवस्थापन समिती गठीत करण्यात यावी. अनुभवी पोहणाऱ्या व्यक्तींची यादी सुद्धा अद्ययावत करण्यात यावी. या यादीत महसूल व पोलीस विभागातील अनुभवी कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात यावा. कार्यप्रणालीची प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) अद्ययावत करून आपत्ती व्यवस्थापन कक्षाला पाठविण्याच्या सूचना त्यांनी केल्या.



धरणाचे पाणी सोडतांना गावकऱ्यांना पूर्व सूचना देण्यात यावी. त्यासाठी दवंडी, सोशल मिडिया आदीचा वापर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले. आपल्या कार्यक्षेत्रात सुरक्षीत निवारा, समाज भवन, शाळा, मंगल कार्यालय, लॉन, मोठ्या इमारती इत्यादींची ओळख करून त्या आरक्षीत करण्याबाबत कार्यवाही आताच करावी. विविध जलाशय, धरण, या ठिकाणी मान्सून कालावधीत सामान्य नागरिकांना जाण्यास प्रतिबंध करणारा आदेश निर्गमीत करावा असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

नदी, नाल्यामधील गाळ काढणे, सफ़ाई व स्वच्छता तातडीने करून घ्यावी. नदी, नाल्याच्या काठावर अतिक्रमण करणा?यांना नोटीस देण्यात यावी. आपल्या जिल्ह्यात वैनगंगा व बाघ या महत्वाच्या नद्या असून या ठिकाणी संदेशवहन यंत्रणा अद्ययावत ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नेमून दिलेली जबाबदारी प्रत्येक विभागाने पार पाडणे अनिवार्य असून मान्सून काळात आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी नियमीत संपर्क ठेवावा असे त्यांनी सांगितले. पूर ओसरल्यावर साथरोग वाढण्याची शक्यता असते, ही बाब लक्षात घेता आरोग्य विभागाने आतापासूनच नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक तालुक्यातील आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक घ्यावी असे निर्देश दिले.

पावसाळ्यात बस वाहून गेली, कार वाहून गेली, नागरिक पुरात अडकले व रेल्वे रुळावर पाणी साचले अशा घटना प्रत्येक वर्षी घडत असतात. हा जुना अनुभव लक्षात घेता या घटना घडणार नाहीत यासाठीच्या उपाययोजना आतापासूनच कराव्यात असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. मागील आपत्तीचा अनुभव व त्याचा अभ्यास करून उपाययोजना कराव्या असे ते म्हणाले. पूर परिस्थितीच्या काळात डोंगा उलटून जिवित हानी झाल्याच्या घटना घडतात ही बाब लक्षात घेता पुराच्या काळात डोंग्याला प्रतिबंध घालण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

पूर किंवा घटना घडल्यानंतर चोविस तासाच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयाला माहिती देण्यात यावी. तालुकास्तरीय कंट्रोल रुम कार्यान्वित करावी तसेच सुरक्षित निवारा येथे मूलभूत सुविधा आहेत का याची खातरजमा करावी. सर्व यंत्रणांनी पूरपरिस्थिती व आपत्तीच्या काळात समन्वय ठेवून काम करावे तसेच दिलेल्या जबाबदारीचे गांभीर्याने पालन करावे अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी विजया बनकर यांनी केल्या. संपर्क तुटणाऱ्या गावांना उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी भेटी देऊन नागरिकांना माहिती द्यावी असेही त्यांनी सांगितले.

# नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात पर्यटकांची २० टक्क्याने वाढ

**गोंदिया:–** जिल्ह्याचे वैभव असलेला नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प आपल्यातील जैवविविधतेमुळे राज्यभरातील पर्यटकांना भुरळ पाडत आहे.वाढती वाघांची संख्या, सहजरित्या दिसून येणारी वन्यप्राणी उघड्या डोळ्याने पाहण्यासाठी पर्यटकांचा कल नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाकडे दिसून येत आहे.

या व्याघ्र प्रकल्पात जवळपास सर्वच श्रेणीचे वन्यजीव दिसून येत असल्याने पर्यटकही मोठ्या प्रमाणात जंगल सफ़ारीचा आनंद घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत यंदा यामध्ये २० टक्क्याने वाढ झाली आहे.मागील वर्षी एप्रिल, मे व जून या तीन महिन्यात १५ हजार पर्यटकांनी भेट दिली होती. तर यावर्षी तीन महिन्यात १७ हजार ३३२ पर्यटकांनी भेट दिली आहे. गेल्या वर्षी ३१ लाख ६० हजार रुपयाचे महसूल तर यंदा ४२ लाख १७ हजार रूपयाचा महसूल विभागाने गोळा केला आहे.



## पर्यटनाला सुगीचे दिवस

**नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला सुगीचे दिवस आले आहेत. वाढती वाघांची संख्या पर्यटकांना आकर्षित करीत आहे. यासाठी शासनानेही पाऊल टाकले असून मागील काही दिवसात चंद्रपूर जिल्ह्यातून तीन वाघ आणून या ठिकाणी सोडण्यात आले आहे. तर दुसरीकडे नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात टी–३ या वाघिणीला बछडे झाल्याने येथील वाघांची संख्या वाढली असून पर्यटकांना सहजरित्या व्याघ्र दर्शन होत असते.**



जिल्ह्यातील नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्प जैवविविधता आणि सर्वच श्रेणीच्या वन्यप्राण्यांचे अधिवास असल्याने राज्यासह देशात ओळखला जातो. ताडोबानंतर येथे वाघाचे हमखास दर्शन होत असल्याने पर्यटकांची गर्दी असते. त्याचबरोबर विविध प्रजाती पशु–पक्षी येथे दिसून येतात. यामुळे जंगल सफ़ारीचा आनंद लुटण्यासाठी दरवर्षी राज्यभरातून पर्यटक या ठिकाणी येत असतात. यंदाही पर्यटकांनी मनसोक्त आनंद लुटला आहे.विशेष म्हणजे, नवेगाव– नागझिरा व्याघ्र प्रकल्प १ जुलै २०२४ पासून पर्यटकांकरिता बंद कण्यातर आला आहे.

# काँग्रेसने मागविले अर्ज तर राष्ट्रवादीने दिला तयारीला लागण्याचा सल्ला

**गोंदिया:** चार महिन्यांनी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीकरिता आतापासूनच रण तापण्यास सुरुवात झाली आहे. त्यातच काँग्रेसने जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघातून इच्छुकांचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने सुद्धा जिल्ह्यातील पदाधिकारी आणि निवडणूक लढविण्यास इच्छूक असणाऱ्यानना मुंबईला बोलावून तयारीला लागण्याचा सल्ला दिला आहे. महाविकास आघाडीचा निर्णय होईल तेव्हा होईल त्यापुर्वी मात्र घटक पक्षांनी एकला चलो रे ची भूमिका घेत मोर्चेबांधणीस सुरुवात केली आहे.

## सर्वांनाच सल्ला पण रिंगणात कोण

**सर्वच राजकीय पक्षांनी जिल्ह्यातील चारही मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छूक असणाऱ्यांना तयारीला लागण्याचा सल्ला दिल आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारसुद्धा आपली–आपली उमेदवारी पक्की असल्याचे सांगत मतदारसंघात होर्डिंग व पोस्टरबाजी करुन प्रचाराला सरुिवात केल्याचे चित्र आहे.**

## विद्यमान आमदार सबुरीने

**विधानसभा निवडणुकीसाठी अनेक इच्छुकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून तयारी सुरु केली आहे. तर काही इच्छूक आताच आमदार झाल्याच्या तोरात वावरत आहे. मात्र विद्यमान चारही आमदारांनी सबूरीने घेत आपला नित्यक्रम सुरु ठेवला आहे. पक्ष जो आदेश ते काम करु असे आमदार सांगत आहे.**

## बाहेरुन येणाऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता

**गोंदिया विधानसभा मतदारसंघात काँग्रेसकडून ऐनवेळी पक्षात प्रवेश करणाऱ्या नेत्याला या मतदारसंघातून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. तर अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघात या पक्षाकडून सर्वाधिक दावेदार असल्याने संधी कुणाला हा प्रश्न आहे. मात्र महाविकास आघाडीत हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे गेल्यास अनेक इच्छुकांचे स्वप्न भंग होण्याची शक्यता आहे.**

लोकसभा निवडणूका महाविकास आघाडी आणि महायुती करुन लढण्यात आल्या. लोकसभेत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाल्याने उत्साह संचारला आहे. त्यामुळे वरिष्ठ पातळीवरील नेते विधानसभा निवडणुकासुद्धा महाविकास आघाडी करुन लढणार असल्याचे सांगत आहेत. तर हेच चित्र महायुतीत आहे. महायुतीचे स्थानिक पातळीवरचे नेते महायुती नको तर स्वतंत्र निवडणुका लढविण्याची भाषा करीत आहे. पण वरुन आदेशापुढे त्यांचे काही चालणार हे त्यांना सुद्धा चांगले ठाऊक आहे. विधानसभा निवडणुका



ऑक्टोबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यासाठी आता तीन महिन्याचा कालावधी शिल्लक असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

जिल्हा काँग्रेस कमिटीने गोंदिया जिल्ह्यातील चारही विधानसभा क्षेत्रातून इच्छुकांचे उमेदवारी अर्ज मागविले आहे. १० ऑगस्टनंतर अर्ज केलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्याची प्रक्रिया सुरु होणार असल्याचे जिल्हाध्यक्षांनी सांगितले.तर काँग्रेसने त्याच दृष्टीकोनातून चारही मतदारसंघात सभा आणि बैठकांचे सत्र सुरु करुन मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

तर महाविकास आघाडीचाच घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि उध्दव सेनेने सुद्धा मतदारसंघावर दावा करीत तयारीला सुरुवात केली आहे. लोकसभेप्रमाणेच विधानसभेसाठी बुथ कमिट्या तयार करण्यास सुरुवात केली आहे. पण तिन्ही घटक पक्षाच्या इच्छुकांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली असल्याने महाविकास आघाडी झाल्यानंतर कुणाचा हिरमोड होणार आणि त्याचा फटका कुणाला बसणार याची सुद्धा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

# ३ ऑगस्टपासून निघणार मंडल यात्रा,गोंदियात होणार समारोप

**गोंदिया:** ओबीसी युवा अधिकार मंच व इतर सहयोगी संघटनाच्या वतीने जातीनिहाय जनगणनेसाठी ३ ते ७ ऑगस्ट दरम्यान विदर्भातील सात जिल्ह्यातून मंडल यात्रा काढण्यात येणार आहे.या यात्रेचा समारोप गोंदियात ७ ऑगस्टला होणार असून दिल्ली येथील विचारवंत प्रा.लक्ष्मण यादव हे समारोप कार्यक्रमाचे मुख्य वक्ते राहणार असल्याची माहिती यात्रेचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम यांनी पत्रपरिषदेत दिली. यात्रेला संविधान चौक नागपूर येथून प्रारंभ होणार आहे. नागपूरमार्गे वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यातून मंडल यात्रेचा प्रवास होणार असल्याचे कोर्राम यांनी सांगितले.

ते म्हणाले, केंद्र सरकारद्वारे ७ ऑगस्ट १९९० रोजी मंडल आयोग लागू करण्यात आला. त्यामुळे ओबीसी समाजाला आरक्षण प्राप्त झाले.मंडल आयोगाच्या शिफ़ारशींमुळे वंचित ओबीसी समाज मुख्य प्रवाहात येत आहे. ७ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण भारतात मंडल दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाच्या औचित्याचे जातीनिहाय जनगणनेचा महत्त्वाचा विषय घेऊन मंडल यात्रा काढण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

ओबीसी समाजाकडून अनेक वर्षांपासून जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली जात आहे. परंतु, केंद्र तथा राज्य शासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे. १९३१ च्या जनगणनेनुसार ओबीसी समाजाची लोकसंख्या ५२ टक्के होती.परंतु, १९३१ पासून तर आजपर्यंत जातीनिहाय जनगणना झाली नाही. त्यामुळे लोकसंख्येसह सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय परिस्थिती समजून येत नाही. जर भारताला महासत्ता बनायचे असेल तर सर्व घटकांचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.





विकासाच्या दृष्टीने धोरण ठरविण्यासाठी भारत सरकारकडे डेटा असणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने भारताची जातीनिहाय जनगणना करावी. यासाठी ओबीसी, एस.सी., एस.टी. समाजात जनजागरण झाले पाहिजे, या उद्देशाने मंडल यात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याचे कोर्राम यांनी सांगितले. पत्रपरिषदेला संघटक दीनानाथ वाघमारे, कृतल आकरे, पंकज सावरबांधे, यजुर्वेद सेलोकर, राहुल वाढई आदी उपस्थित होते.

# भारत हा औषधी वनस्पतीचा खजिना :अति.मुकाअ डॉ. लोखंडे

**गोंदिया:** भारत हा औषधी वनस्पतींचा खजिना आहे. अनेक रोग आणि आजारांना कोणत्याही दुष्परिणामांशिवाय बरे करण्याची क्षमता वनस्पती औषधीमध्ये असल्याने प्राचीन काळापासून भारतीय विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींचा वापर करीत आहेत.त्यामुळै औषधी वनस्पती वाढवणे ही आजची गरज आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.तानाजी लोखंडे यांनी केले.



तालुक्यातील शिवणी येथील आयुष आयुर्वेदिक रुग्णालयाच्या भेटी दरम्यान ते बोलत होते. यावेळी जिल्हा आयुष अधिकारी डॉ.मिना वट्टी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रकल्प अधिकारी आनंदराव पिंगळे, आरोग्य विभागाचे जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल प्रामुख्याने उपस्थित होते. प्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेमकुमार बघेले यांनी आयुर्वेदीक दवाखाना आणि आयुष्मान आरोग्य मंदीरातील आरोग्य विषयक व हर्बल गार्डनची माहिती अधिकाऱ्यांना दिली. तसेच डॉ. तानाजी लोखंडे यांनी रुग्णालयातील आयुष पध्दत व हर्बल गार्डनचे कौतुक करुन डॉ. प्रेमकुमार बघेले व त्यांच्या आरोग्य पथकाचे अभिनंदन केले. यावेळी ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व गावकरी उपस्थित होते.

# इंजिनियरने वृद्धाला दोन लाखाने गंडविले

**गोंदिया :** थायलंड येथे भिक्खू बनल्यास दान म्हणून खूप पैसे मिळतील, त्यासाठी पासपोर्ट तयार करण्याचा खर्च आणि तुमच्या नातवाला नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून दोन लाख १० हजार रुपये घेऊन फ़सवणूक करणा?या इंजिनियरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोशन प्रीतीचंद मेश्राम (४३, प्लॉट नंबर–२०४ कळमना रोड, नागमंदिर जवळ, आदर्श नगर, कामठी–नागपूर) असे आरोपीचे नाव आहे.

आरोपी रोशन मेश्राम याने तिरोडा तालुक्यातील ग्राम मेंढा येथील रहिवासी येणू सदाशिव सुरसाऊत (६७) यांना स्वतः मोठ्या कंपनीमध्ये इंजिनियर होतो, माझी खूप ओळख आहे असे सांगून तुमचा नातू सुभाष बावनथडे (२३, रा. सोनपुरी, ता. किरणापूर–बालाघाट) याला नोकरी लावून देतो असे आमिष दिले. तसेच तुम्हाला थायलंडला जाण्यासाठी पासपोर्ट बनवून देतो आणि समाजकल्याण विभागातून घर मिळवून देतो असेही आमिष दिले देत त्यांच्याकडून दोन लाख १० हजार रुपये घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली. त्याचप्रकारे साक्षीदार पुष्पा संतकुमार कटरे (६४, रा. मेंढा) यांच्या घरी जाऊन त्याने मी तुमचा पासपोर्ट काढून तुम्हाला थायलंड येथे घेऊन जातो व तुम्ही भिक्खू झाले की थायलंडमध्ये भरपूर दान मिळते. त्याकरिता तुम्हाला पासपोर्ट काढावा लागेल, असे सांगून त्यांच्याकडूनही पैसे घेतले. प्रकरणी आरोपीवर भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गोठा बांधकामाचा ६८ लाखाचा निधी अडकला; लाभार्थी अडचणीत

**गोरेगाव :** शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी पशुपालन करतात. यात दुभत्या जनावरांना अधिक पसंती दिली जाते. त्यामुळे शासनाकडून पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना योजनेतंर्गत गोठा बांधकामासाठी अनुदान दिले जाते. त्यानुसार सन २०२२–२३, २०२३–२४ या आर्थिक वर्षात गोरेगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी गोठा बांधकाम योजनेतंर्गत लाभ घेतला. परंतु, लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांचे जवळपास ६८ लक्ष रूपयाचे अनुदान शासनदरबारी अडकले आहेत. यामुळे लाभार्थी अडचणीत सापडले असून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात आहे.





## पं.स.कार्यालयाची पायपीट

**गोठा बांधकाम अंतर्गत लाभार्थ्यांचे ६८ लक्ष रूपयाचे अनुदान अडकून पडले आहेत. यामुळे अनुदानाच्या प्रतिक्षेत असलेले लाभार्थी दररोज पंचायत समिती कार्यालयाचे चकरा मारत आहेत. अधिका?यांकडे वारंवार विचारणा केली जात आहे. निधीच नसल्याचे सांगून अधिकारी लाभार्थ्यांना परत पाठवत आहेत. यामुळे थकीत अनुदानासाठी लाभार्थ्यांची पायपीट सुरू आहे.**

शेतीला जोडधंदा म्हणून बहुतांश शेतकरी गाय, म्हैस पाळतात. परंतु ग्रामीण भागात बहुतांश जनावरांच्या गोठयाची जागा ही ओबडधोबड व खाचखळग्यानी भरलेली असते, सदरचे गोठे हे व्यवस्थित नसतात त्यामुळे जनावरांना ऊन, वारा, पाऊस, थंडी यांचा सामना करावा लागतो. पावसाळ्याच्या दिवसांत गोठ्यातील जमीन दलदली सारखी होते व त्या जागेतच जनावरे बसत असल्यामुळे ते विवीध प्रकारच्या आजारांना बळी पडतात. तसेच काही जनावरांना स्तनदाह होऊन उपचारांसाठी हजारो रुपये खर्च होतात. शेतकरी हे आर्थिकदृष्ट्या गरीब आहेत. त्यामुळे जनावरांसाठी पक्क्या स्वरूपात गोठा बांधण्यासाठी त्यांच्या जवळ पुरेसे अर्थसहाय्य उपलब्ध नसते.

त्यामुळे या समस्येचा विचार करून राज्य शासनाने गोठा अनुदान सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत गोठा बांधणीसाठी पशुपालक व शेतक?यांना राज्य शासनाद्वारे आर्थिक सहाय्य देण्यात येते. या योजनेतंर्गत सन २०२२–२३, २०२३–२४ या आर्थिक वर्षात गोरेगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी लाभ घेत आहे. परंतु, मागील तीन आर्थिक वर्षांपासून ६८ लक्ष रुपयाचा निधी शासनस्तरावर अडकून पडला आहे. यामुळे गोठा बांधकाम लाभार्थी अडचणीत सापडले आहेत.

या प्रकाराकडे जनप्रतिनिधींचेही दुर्लक्ष होत आहे. यामुळे शासनाने याकडे लक्ष देवून अनुदानासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे.

# पेट्रोलपंपावर चोरी करणारे पोलिसांच्या ताब्यात

**गोंदिया:** मूर्रीच्या साई पेट्रोल पंप येथील मजूर राहुल राजकुमार गोंडाणे (३२) रा. संजयनगर गोविंदपुर गोंदिया यांना १३ जुलै रोजी दुपारी ३ वाजता मारहाण करणाऱ्या आरोपी कुणाल विनोद धकाते (२५) रा.चंद्रशेखर वार्ड, श्रीनगर गोंदिया व आनंद ऊर्फ लालबाल राजेश नागपुरे (२७) रा. दांडेगाव ता. जि गोंदिया या दोघांना गोंदिया शहर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याजवळून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त केली.

या आरोपींनी पेट्रोल भरल्यावर आपसात वाद केला. येथे भांडण करू नका असे राहूल म्हणाला असता त्याला आरोपींनी मारहाण करून पेट्रोलपंपच्या ड्रॉव्हर मधून १२ हजार ३०० रूपये जबरीने हिसकावून नेले होते. यासंदर्भात गोंदिया शहर पोलिसात भारतीय न्याय संहिता कलम कलम ३०९ (६) अन्वये गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा, उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिणी बानकर, पोलीस निरीक्षक किशोर पर्वते यांच्या मार्गदर्शनात करण्यात आला. या प्रकरणात दोन्ही आरोपींकडून ६ हजार ४०० रूपये रोख व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल किंमत ४० हजार असा एकुण ४६ हजार ४००/– रुपयाचा माल हस्तगत करण्यात आला. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गराड करीत आहेत.



ही कारवाई गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय गराड, पोलीस हवालदार कवलपालसिंग भाटीया, जागेश्वर उईके, सुदेश टेंभरे, दिपक रहांगडाले, सतिश शेंडे, प्रमोद चव्हाण, निशीकांत लोंदासे, पोलीस शिपाई अशोक रहांगडाले, दिनेश बिसेन, मुकेश रावते, सुभाष सोनवाने, सनोज सपाटे यांनी केली आहे.

# गावातील कचरा संपवून गावे मॉडेल करा

**मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. वांचे निर्देश: गटविकास अधिकारीयांचीआढावा बैठक**

**गोंदिया :** वाढत्या शहरीकरणामुळे कचऱ्याची समस्या देखील वाढली. गावं स्वच्छ, सुंदर असावीत, गावातील वातावरण पर्यावरण पोषक असून गावातील कचरा संपवून गावे हागणदारी मुक्त अधिक मॉडेल करण्याचे निर्देश जिल्हा परिषद गोंदियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरूगानंथम यांनी दिले.



जिल्हा परिषदेच्या कॉन्फरन्स हॉल मध्ये शुक्रवारी (ता. १२) गटविकास अधिकारी यांची विविध विषयांवरील आढावा बैठक पार पडली. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर, पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकार आनंदराव पिंगळे यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी गावे हागणदारी मुक्त अधिक मॉडेल करण्याबाबतचा आढावा घेतांना अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावी. तथा सप्टेंबर अखेर पर्यंत सर्व गावे मॉडेल करण्याचे निर्देश देवून सर्व कामांचा साप्ताहिक आढावा घेण्याचे सूतोवाचही मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी केले. दरम्यान गावात दोन हेक्टर जागेवर बांबू लागवड करण्याचे तथा त्यासाठी प्रत्यक्षातब लक्ष देण्याचे निर्देशही त्यांनी याप्रसंगी दिले. जिल्हयात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचे कार्य करण्यावर शासनाचा भर आहे त्यादृष्टीने १५ व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत नियोजन व खर्च वाढविण्यावर बैठकीत भर देण्यात आला. दरम्यान वैयक्तीक व सार्वजनिक शौचालयांचे कार्य देखील सप्टेंबर अखेपर्यंत पूर्ण करावे. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या कार्याला येत्या २२ तारखेपर्यंत तांत्रिक मान्यता प्रदान करावी. ६३३ गावे प्रत्यक्षात मॉडेल करावयाची असल्याने त्याचे मासिक नियोजन करून महत्वपूर्ण कामांना प्रथमिकता देण्याची सूचना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रमिला जाखलेकर यांनी केली. १५ व्या वित्त आयोगासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंदराव पिंगळे यांनी संपूर्ण माहिती देवून नियोजनावर भर दिला, बैठकीत गोरेगावचे गटविकास अधिकारी शुभम जाधव, तिरोडयाचे गटविकास अधिकारी सतिश लिल्हारे, आमगावचे गटविकास अधिकारी ए.के गिन्हपुजे, देवरीचे गटविकास अधिकारी जी. टी. सिंगनजुडे अर्जुनी मोरगावचे गटविकास अधिकारी एस.आय. वैद्य, सालेकसाचे गटविकास अधिकारी संजय पूरी, सडक अर्जुनीचे गटविकास अधिकारी रविकांत सानप, नरेगाचे गटविकास अधिकारी डी. एस. लोहबरे सर्व तालुक्याच विस्तार अधिकारी आणि जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे सर्व सल्लागार यावेळी उपस्थित होते.